सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १५९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजनांसाठी मंत्रिमंडळ समिती; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; शनिवारपूर्वी दुष्काळाची पहिली अधिसूचना काढणार

**मुंबई :** राज्यावर दुष्काळाचे संकट घोंगावत असताना त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला मंत्रिमंडळाचे अधिकार देण्यात आले असून दुष्काळी परिस्थितीत आवश्यक निर्णय घेण्याचे आणि उपाययोजना करण्याचे अधिकार समितीला असतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली. मुख्य सचिव राजेश अग्रवाल हे समितीचे सदस्यसचिव म्हणून काम पाहणार असून समिती दररोज परिस्थितीचा आढावा घेणार आहे.

राज्यातील बहुतांश भागांत पावसाअभावी पिके करपण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळासंदर्भातील पहिली अधिसूचना शनिवारपूर्वी काढण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. उपलब्ध माहितीच्या आधारे दुष्काळ निवारणासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येणार असून नुकसानग्रस्त भागातील पंचनामे बुधवारपासून सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्य सरकारने यापूर्वीही जिल्हानिहाय सर्वेक्षण आणि तातडीच्या उपाययोजनांवर भर दिला होता. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत मंत्री गिरीश महाजन, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, दत्तात्रय भरणे, जयकुमार गोरे, प्रताप सरनाईक, मकरंद आबा पाटील, बाबासाहेब पाटील आदी मंत्री असतील. या उपसमितीचे सचिव म्हणून राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल काम पाहतील.

दुष्काळी परिस्थितीचा समितीकडून नियमित आढावा घेतला जाणार आहे. समितीची दर आठवड्याला बैठक होणार असून, गरजेनुसार समितीचे सदस्य प्रत्यक्ष दुष्काळग्रस्त भागात जाऊन पाहणी करतील. दुष्काळाच्या काळात विविध विभागांशी संबंधित अनेक निर्णय तातडीने घ्यावे लागतात. त्यामुळे मंत्रिमंडळाचे अधिकार समितीला देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दुष्काळ जाहीर करणे पुरेसे नसून प्रत्यक्ष उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**पिण्याच्या पाण्याला प्राधान्य**

दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ नये, यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्यातील काही भागांत पावसाचा परिणाम भात पिकावरही झाला असून कोकणातील काही भागांत भातपिकाचे नुकसान झाल्याचे फडणवीस यांनी सांगितले. दुष्काळ निवारणासाठी केंद्र सरकारकडे आर्थिक मदतीची मागणी करण्यात येणार आहे. मात्र केंद्राकडून मदत मिळण्याची प्रतीक्षा न करता राज्य सरकारकडून आवश्यक मदत आणि उपाययोजना केल्या जातील, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**कर्नाटककडूनही अधिसूचनेची तयारी -**

दुष्काळाच्या निकषांबाबत विचारलेल्या प्रश्नावर कर्नाटकात अद्याप दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तेथे दुष्काळाची अधिसूचना काढण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) मदतीसंदर्भातील निर्णय संसदेने केलेल्या कायद्यानुसार ठरतात, असेही फडणवीस यांनी नमूद केले. - दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रिक्त पदे भरण्याबाबतही प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) संदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत सादरीकरण झाले असून, आयोगाशी संबंधित कथित गैरप्रकाराचे प्रकरण नव्या अध्यक्षांच्या रुजू होण्यापूर्वीचे असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# राजकीय मागण्यांत रस नाही; विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या पूर्ण करू!

## एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याच्या मागणीवर फडणवीस यांची भूमिका



**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर अध्यक्षांच्या राजीनाम्याची होत असलेली मागणी ही राजकीय स्वरूपाची असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना सरकारचे प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले. "आम्हाला राजकीय मागणीत रस नाही. त्याचे जे व्हायचे असेल ते होईल. आमचा इंटरेस्ट विद्यार्थ्यांच्या मागण्यांमध्ये आहे. विद्यार्थ्यांची प्रत्येक न्याय्य मागणी राज्य सरकार पूर्ण करेल," अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले की, एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी ज्या परीक्षा किंवा कथित घोटाळ्याच्या संदर्भात केली जात आहे, तो प्रकार संबंधित अध्यक्ष पदावर येण्यापूर्वीच घडला होता. एमपीएससीच्या भरतीसंदर्भातील अधिकार राज्यपालांकडे आहेत. एखाद्या व्यक्तीने संस्थेत काय काम केले, त्याच्या कामाचे मूल्यमापन काय आहे, याचा विचार न करता, कोणतीही चौकशी किंवा पुरावे नसताना केवळ राजकीय मागणी करणे योग्य नसल्याचे त्यांनी नमूद केले.

**एमपीएससीच्या**

परीक्षांबाबत व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या सुनावण्या सुरू असून, समिती सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेत असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांशी थेट संवादाची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. परीक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर वस्तुनिष्ठ म्हणजेच बहुपर्यायी पद्धत लागू करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे. दळवी समितीने यापूर्वी बहुपर्यायी पद्धतीकडून वर्णनात्मक पद्धतीकडे जाण्याची शिफारस केली होती. त्यानुसार शासन आणि एमपीएससीने निर्णय घेतला होता. मात्र, आता पुन्हा बहुपर्यायी पद्धत लागू करण्याची मागणी जोर धरत आहे. याबाबत समिती विचार करत असून, समितीने तशी शिफारस केल्यास शासन त्याकडे सकारात्मकपणे पाहील, असे फडणवीस यांनी सांगितले. एमपीएससीच्या परीक्षांसाठी उपलब्ध पदांची संख्या कमी असल्याच्या मुद्द्यावरही फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. विशेषतः गट-कच्या पदांची संख्या कमी असल्याचे सांगितले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत एमपीएससीशी संबंधित पाच विभागांचे सादरीकरण करण्यात आले असून, प्रत्येक मंत्रिमंडळ बैठकीत संबंधित विभागांमधील एकूण पदे, रिक्त पदे आणि एमपीएससीकडे मागणी करण्यात आलेल्या पदांचा नियमित आढावा घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

"पुढच्या परीक्षेत आतापर्यंतचे सगळे विक्रम मोडणारी पदे आणण्याचा निर्णय आम्ही केला आहे," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रिक्त पदे भरण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबतही विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. एमपीएससीसंदर्भातील समितीचा अहवाल आल्यानंतर त्यावर शासन निर्णय घेणार असल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# मनोज जरांगे यांच्या सहकाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांची आयकर विभागाकडून चौकशी

**मुंबई :** मराठा आरक्षण आंदोलनाशी संबंधित काही नेते, त्यांचे नातेवाईक आणि व्यावसायिक सहकाऱ्यांच्या आर्थिक व्यवहारांची आयकर विभागाकडून छाननी केली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. आयकर विवरणपत्रे, मालमत्ता, मोठे आर्थिक व्यवहार तसेच व्यावसायिक संबंधांची तपासणी केली जाणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाशी संबंधित व्यक्ती किंवा त्यांच्या नातेवाईकांशी संबंधित कंपन्यांना मिळालेल्या सरकारी कंत्राटांचीही चौकशी केली जाणार असल्याचे समजते.

प्राथमिक माहितीनुसार, संबंधित व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांबरोबरच निधीच्या स्रोताची, जमीन आणि मालमत्तेचीही छाननी केली जात आहे. छत्रपती संभाजीनगरमधील एका कंपनीला सुमारे ७६४.७ कोटी रुपयांची सरकारी कामे मिळाल्याच्या आरोपांचीही तपासणी केली जाणार आहे. कंत्राटातील बोली प्रक्रिया आणि संबंधित व्यवहारांमध्ये झालेली वाढ यांचीही तपासणी होणार आहे.

या व्यवहारांकडे मनोज जरांगे पाटील यांचे माजी सहकारी अजय बारस्कर यांनी केलेल्या आरोपांनंतर लक्ष वेधले गेले होते. बारस्कर यांनी जरांगे यांच्यावर आंदोलनाच्या माध्यमातून कंत्राटे मिळवून दिल्याचे आरोप केले होते. तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि जरांगे यांच्या भेटीबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले होते.

दरम्यान, सरकारी कंत्राटांमध्ये राजकीय फायदा किंवा 'क्विड प्रो क्वो' झाल्याचा पुरावा नसल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे असल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यामुळे आयकर विभागाकडून होणाऱ्या चौकशीत संबंधित आर्थिक व्यवहार आणि कंत्राटांबाबत नेमकी कोणती तथ्ये समोर येतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# तरुणांमधली मोबाईलचा अतिरिक्त वापर पालकांना चिंता निर्माण करणारा - प्रशांत गोंदकर

शिर्डी (प्रतिनिधी) तरुणांमध्ये मोबाईलचा अतिरिक्त वापर होत असल्यामुळे मुलांना मैदानी खेळांची विसर पडत असून लहान कमी वयातच मधुमेह, नेत्र व मेंदू , लठ्ठपणा अशा विविध आजाराच्या गंभीर समस्येमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळून मैदानी खेळाला प्राधान्य देणे काळाची गरज झाली असल्याचे मत शिर्डीतील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गोंदकर यांनी व्यक्त केली आहे.

मोबाईलचा होत असलेला अतिरिक्त वापर याबाबत बोलताना प्रशांत गोंदकर म्हणाले देशाची तरुण पिढी ही देशाची शक्ती असते, तरुणच देशाची, कुटुंबाची प्रगती करू शकतात, कोरोना काळात ऑनलाइन शिक्षण पद्धती, झूम मीटिंग उदयास आली, गरीब, श्रीमंत, मध्यमवर्गीय यांनी स्वतःच्या मूलभूत गरजा बाजूला ठेवून शाळेत जाणाऱ्या मुलांना प्राधान्याने अँड्रॉइड मोबाईल घेऊन दिले,

मुलं पण मोबाईलवर अभ्यास करायला लागली, अभ्यास झाल्यानंतर कळत नकळत मोबाईलवर रिल्स बघणे, व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम इतर ॲप डाऊनलोड करून नवीन नवीन मित्र, मैत्रिणी जॉईन झाले, अभ्यासाचा मूळ हेतू बाजूला राहिला, गेम्स खेळणे व इतर मोबाईल वापरात जास्त वेळ जाऊ लागला परिणामी मैदानी खेळाला विसर पडला कोरोना काळ संपला शाळा पूर्वत चालू झाल्या परंतु मुलांच्या हातात आलेला मोबाईल हातातून सुटला नाही, कोरोना काळातील बहुतांश विद्यार्थी आज तरुण झालेले आहेत, रात्री उशिरापर्यंत मोबाईलचा वापर करतात सकाळी झोपेतून उशिरा उठतात मुलं पालकांपेक्षा मोबाईलच्या जास्त आहारी गेलेले आहेत, मोबाईल मध्ये व्यवसायासंदर्भात बघितलेल्या रील्स व्हिडिओ खरी वाटून मुलं कुठलाही प्रत्यक्षात अनुभव नसताना लाखो करोडोचे कर्ज करून व्यवसाय उभा करतात अथवा जमीन गुंठे विकून व्यवसाय करतात, त्यातून अपेक्षेप्रमाणे व्यवसायात फायदा होत नाही त्यामुळे अनेक तरुण निराश होतात. मोबाईलचा अतिरिक्त वापर होत असल्यामुळे विद्यार्थी तसेच पालकांमध्ये संवाद कमी होत चालला आहे पूर्वी

# धार्मिक मिरवणुकांतील आवाजावर हायकोर्टाची नजर, कायद्याच्या अंमलबजावणीचा मागवला अहवाल

**मुंबई :** धार्मिक मिरवणुका आणि उत्सवांदरम्यान होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली आहे. मुंबईसह महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांदरम्यान होणाऱ्या मोठ्या आवाजाबाबत न्यायालयाने राज्य सरकारकडून संबंधित कायदे आणि त्यांची अंमलबजावणी कशी केली जात आहे, याची माहिती मागवली आहे.

**'उत्सव साजरे करण्यास आक्षेप नाही, पण...'**

न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश दिले. ध्वनिप्रदूषणासंदर्भात कायद्याचे मजबूत चौकट अस्तित्वात असतानाही प्रत्यक्षात त्याची अपेक्षित अंमलबजावणी होत नसल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. उत्सव आणि धार्मिक मिरवणुका आयोजित करण्यास आक्षेप नसला, तरी त्याचा नागरिकांच्या कायदेशीर हक्कांवर विपरीत परिणाम होऊ नये, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

धार्मिक उत्सवांमध्ये फटाके वाजवण्यासाठी दिल्या जाणाऱ्या परवानग्यांवरही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले. फटाक्यांमुळे ध्वनीप्रदूषणासोबतच हवेच्या गुणवत्तेवरही परिणाम होत असल्याचे न्यायालयाने नमूद केले. मुंबईतील वायुप्रदूषणाची गंभीर परिस्थिती लक्षात घेता ध्वनी आणि वायुप्रदूषण करणाऱ्या फटाक्यांवर बंदी घालण्याची वेळ आली आहे का, याबाबत न्यायालयाने प्राथमिक निरीक्षण नोंदवले आहे.

न्यायालयाने वाहतूक पोलिस आयुक्त, नगरविकास विभागाचे सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि मुंबई महापालिका आयुक्त यांना नोटीस बजावून ध्वनिप्रदूषण नियंत्रणासाठी कायदेशीर निकष आणि त्यांची अंमलबजावणी याबाबत उत्तर मागितले आहे. दरम्यान, पुण्यासह राज्यातील विविध भागांत उत्सवांमधील मोठ्या आवाजाच्या साउंड सिस्टीम आणि डीजेविरोधात नागरिकांकडूनही आवाज उठवला जात आहे. पुण्यातील ध्वनिप्रदूषणविरोधी कार्यकर्ते विद्यानंद बापट यांच्यावर 3 सप्टेंबर रोजी टीव्ही मुलाखतीदरम्यान हल्ला झाल्यानंतर हा मुद्दा आणखी चर्चेत आला.

ध्वनिप्रदूषणाच्या नियमांची अंमलबजावणी होत नसल्याचा मुद्दा उपस्थित करणारी आणखी एक जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल झाली आहे. या याचिकेवर 5 ऑक्टोबर रोजी सुनावणी होणार आहे. दरम्यान, मुंबई पोलिसांनी ध्वनीची पातळी तपासण्यासाठी कर्मचाऱ्यांना डेसिबल मीटर उपलब्ध करून दिले आहेत. दिलेल्या माहितीनुसार, दिवसा 55 डेसिबल आणि रात्री 45 डेसिबल ही अनुमत मर्यादा असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना देण्यात आले आहेत. दरम्यान, ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा चर्चेत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याचं आवाहन केलं होतं. पुण्यात बोलताना त्यांनी डीजेच्या मोठ्या आवाजाची तुलना भूकंपाच्या आवाजाशी केली होती. उत्सव कसा साजरा करायचा, याबाबत नागरिकांना विश्वासात घेऊन सहमती निर्माण करण्याची गरज असल्याचं त्यांनी म्हटलं होतं.

याच पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनीही गणेशोत्सवादरम्यान डीजे सिस्टीमला परवानगी दिली जाणार नसल्याचं स्पष्ट केलं होतं. ध्वनिप्रदूषणाच्या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांना डेसिबल मीटर देण्यात आले असून, दिवसा 55 डेसिबल आणि रात्री 45 डेसिबल ही अनुमत मर्यादा असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

# उबाठा गटाच्या माजी नगरसेविका विशाखा राऊत यांना सर्वोच्च न्यायालयाचा मोठा झटका; अपात्रता कायम

**मुंबई :** उबाठा गटाच्या माजी नगरसेविका विशाखा राऊत (Vishakha Raut) यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा कायदेशीर फटका बसला आहे. बोगस जात प्रमाणपत्र प्रकरणामुळे नगरसेवक पद रद्द होण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले आहे. न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला तसेच जात पडताळणी समितीच्या आदेशाला स्थगिती देण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. त्यामुळे विशाखा राऊत यांची नगरसेवक पदावरील अपात्रता कायम राहिली असून, त्यांना कोणताही अंतरिम दिलासा मिळालेला नाही.

**स्थगिती देण्यास खंडपीठाचा साफ नकार :** न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर विशाखा राऊत यांनी दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिकेवर (SLP) सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान न्यायालयाने या याचिकेवर नोटीस जारी केली खरी, परंतु उच्च न्यायालयाच्या अपात्रतेच्या निर्णयाला अथवा पालघर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या आदेशाला स्थगिती देण्यास साफ नकार दिला. या निर्णयामुळे विशाखा राऊत यांच्याविरुद्ध जारी झालेली अपात्रतेची राजपत्र अधिसूचना लागूच राहणार आहे.

**रिक्त जागेबाबत सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वाची दिशा :** जरी विशाखा राऊत यांची अपात्रता कायम ठेवून त्यांना पदावर पुनर्स्थापित करण्यास न्यायालयाने नकार दिला असला, तरी एक महत्त्वाचा दिलासा म्हणजे, अपिलीय प्राधिकरणाचा अंतिम निर्णय येईपर्यंत ही रिक्त झालेली नगरसेवक पदाची जागा भरली जाणार नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता २७ ऑक्टोबर रोजी होणार असून, अपिलीय प्राधिकरणाचा निर्णय काय येतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# डब्यात मेथीची भाजी आणली म्हणून विद्यार्थ्याला 50 रुपयांचा दंड ? शाळा प्रशासनाचा अजब अट्टाहास

**मुंबई :** मिरा-भाईंदर परिसरातील शाळांमध्ये पर्यूषण पर्वाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या आहारावर लादल्या जाणाऱ्या निर्बंधांचा मुद्दा आता चांगलाच तापला आहे. आमदार नरेंद्र मेहता यांच्या 'सेव्हन स्क्वेअर' शाळेतील वादानंतर आता भाईंदर येथील 'तपोवन विद्यालया'तही असाच एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. एका अल्पवयीन विद्यार्थ्याने डब्यात मेथीची भाजी आणली म्हणून शाळेने त्याला चक्क ५० रुपयांचा दंड ठोठावल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आक्रमक भूमिका घेत शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल केली आहे. तपोवन विद्यालयाने पर्यूषण पर्वाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना डब्यात विशिष्ट खाद्यपदार्थ न आणण्याचे निर्देश दिले होते. यामध्ये मांसाहारासोबतच कांदा, लसूण, बीट आणि जमिनीखाली उगवणाऱ्या इतर भाज्यांवर बंदी घालण्यात आली होती. मात्र, एका विद्यार्थ्याने नेहमीप्रमाणे आपल्या डब्यात मेथीची भाजी आणली. हे शिक्षकांच्या निदर्शनास आल्यावर त्याला नियमांचे उल्लंघन केल्याचे सांगत ५० रुपयांचा दंड आकारण्यात आला. एवढ्यावरच न थांबता, विद्यार्थ्याचा डबा बाजूला ठेवून त्याला शाळेच्या उपाहारगृहातून (कॅन्टीन) दुसरे अन्न विकत घेऊन खाण्यास सांगण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे.

# ढोरेगावच्या जिल्हा परिषद शाळेचा क्रीडा क्षेत्रात डंका!; 'वुशू सांडा' स्पर्धेत तीन विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड; पाचही खेळाडूंची पदकांची कमाई

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.२२ :** तालुक्यातील ढोरेगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. जिल्हास्तरीय आंतरशालेय वुशू (सांडा फाईट) स्पर्धेत शाळेच्या पाच विद्यार्थ्यांनी पदकांची कमाई केली असून, त्यापैकी तीन विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक पटकावत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय क्रीडा संकुलात १७ वर्षांखालील वयोगटासाठी आंतरशालेय वुशू सांडा फाईट क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ढोरेगाव जिल्हा परिषद शाळेच्या पाच विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

यामध्ये आर्यन रवी ठोळे, सुमेरा शब्बीर शेख आणि माहिम युनूस शेख यांनी आपल्या गटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले.




त्यांच्या या कामगिरीमुळे तिन्ही खेळाडूंची बीड येथे २४ सप्टेंबरपासून होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

**पदक विजेते खेळाडू**

**सुवर्णपदक व विभागीय स्पर्धेसाठी निवड :** आर्यन रवी ठोळे, सुमेरा शब्बीर शेख, माहिम युनूस शेख.

**रौप्यपदक :** प्रशांत राहुल आल्हाट

**कांस्यपदक :** झोया नजीर शेख

**ग्रामीण विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक**

बीड येथे २४ सप्टेंबरपासून होणाऱ्या विभागीय स्पर्धेत हे तिन्ही सुवर्णपदक विजेते खेळाडू छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही क्रीडा क्षेत्रात मिळवलेले हे यश कौतुकास्पद असून, त्यांच्या कामगिरीबद्दल ढोरेगाव परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशाबद्दल सरपंच रजियाबी अयुब पटेल, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खलिल पटेल, उपाध्यक्ष अशोक कांबळे, गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे, शिक्षण विस्तार अधिकारी अनिलकुमार सकदेव, केंद्रप्रमुख सचिन डमाळे, केंद्रीय मुख्याध्यापिका अंजली पुन्हे, राजेश हिवाळे, मनोज घुले, शंकर राऊत, दिलीप धर्माधिकारी, भाऊसाहेब गाढवे, मुग्धा निमसे, नीलिमा कुलकर्णी, अली बाकोदा, शामीर शेख, सचिन पाटसकर आणि कल्याणी जगताप यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

खेळाडूंना प्रशिक्षक अली बाकोदा, सुमीत खरात, बंटी राठोड, शेख मुदस्सीर, उदय तगरे,महेश गायकवाड, सायली आणि शेखर गायकवाड, सारिका घोटकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षकांनी सर्व पदकविजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# पोलिस कर्मचाऱ्यावर टोळक्याचा हल्ला!; दुचाकी अडवून मारहाण,लोखंडी रॉडने डोक्यात वार;दोघे ताब्यात इतर फरार

बीड (प्रतिनिधी) बीड शहरामध्ये मागील काही महिन्यांमध्ये रात्रीच्यावेळी नशेमध्ये काही तरुणाचे टोळके दहशत निर्माण करण्यासाठी भांडणे,हाणामारी तसेच शस्त्राने वार देखील करत असल्याच्या घटना आहेत.यामुळे बीड पोलिसांनी रात्रीच्या वेळी विनाकारण फिरणाऱ्यावर व वेळेचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल,बियर बार,धाबे व बिर्याणी हाऊसवर कारवाई मोहीम हाती घेण्याची गरज आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत मागील महिन्यातच माने कॉम्प्लेक्स भागात मागील भांडणाची कुरापत काढून दोघांवर दहा जणांच्या टोळक्याने लाठी काठ्याने व शस्त्राने हल्ला केल्याने दोघे गंभीर जखमी झाले होते यातील पाच आरोपी अद्यापही फरार आहेत. एक महिन्यानंतरही फरार आरोपीचा शोध लागत नसल्याने शिवाजी नगर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. DB पथक काय करते? गुन्हेगारावर पोलिसांचा वचक राहिला नाही का?असा देखील सवाल उपस्थित होत आहे.

टोळक्याने एका पोलिस अंमलदाराची मोटारसायकल अडवून त्यांच्यावर सशस्त्र हल्ला केल्याची घटना २१ सप्टेंबर रोजी रात्री शहरातील नगर रोडवर घडली. या हल्ल्यामध्ये पोलिस अंमलदारासह अन्य एक जखमी झाले आहेत. या हल्ल्यात खांडेकर यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली असून बीड येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पोलिस अंमलदार खांडेकर यांच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात सहा ते सात जणांविरुध्द जीवे मारण्याचा प्रयत्न केल्यासह अन्य कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काल रात्री उशिरा पोलिसांनी या प्रकरणात दोन आरोपींना अटक केली आहे.दरम्यान गेल्या काही दिवसांपासून मध्यरात्रीच्या वेळी टोळ्यांकडून लोकांना त्रास देण्याचा प्रयत्न सुरू आहे. आठवडाभरापुर्वीच सुभाष रोडवर एका तरूणाला मध्यरात्री आडवून लुटल्याची घटना घडली होती, त्यामुळे अशा टोळक्यांचा पोलिसांनी बंदोबस्त करावा अशी मागणी होवू लागली आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार गेवराई पोलिस ठाण्यात पोलिस अंमलदार म्हणून कार्यरत असलेले धीरज कल्याण खांडेकर (वय ३३ वर्ष, रा. पालवन चौक, बीड) हे २१ सप्टेंबर २०२६ रोजी मध्यरात्री मोटारसायकलवरून जात असताना आरोपींनी इतर साथीदाराला बोलवून हल्ला केला.

तू गाडीचा हॉर्न का वाजवलास ? अशी कुरापत काढून आरोपींनी त्यांच्याशी भांडण उकरून काढले. त्यानंतर हातातील लोखंडी रॉडने खांडेकर यांच्या डोक्यात मारहाण केली आणि दगडाने उजव्या पायावर मारून गंभीर दुखापत केली. तसेच, तक्रारदार व त्यांच्यासोबत असलेल्या अन्य एकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली.

शिवाजी नगर पोलिसांनी तातडीने तपास करून प्रज्वल दीपक मस्के (रा. संत नामदेव नगर, धानोरा रोड, बीड), ओमकार लाटे (रा. ग्रामसेवक कॉलनी, नगर रोड, बीड) यांना अटक केली असून याप्रकरणातील अन्य आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. मुंडे पुढील तपास करीत आहेत.

या प्रकरणी खांडेकर यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ (१), ११८ (२), १८९ (२), १९१ (२) (३), १९० आणि १२३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत प्रज्वल दीपक मस्के (रा. संत नामदेव नगर, धानोरा रोड, बीड) आणि ओमकार लाटे (रा. ग्रामसेवक कॉलनी, नगर रोड, बीड) यांना अटक केली आहे. अन्य आरोपींचा शोध सुरू आहे.

दरम्यान, शहरात मध्यरात्रीच्या वेळी टोळक्यांकडून नागरिकांना त्रास देण्याच्या घटना वाढत असल्याची चर्चा आहे. काही दिवसांपूर्वी सुभाष रोडवर एका तरुणाला लुटल्याची घटना घडली होती. त्यामुळे रात्रीच्या वेळी अशा टोळक्यांवर पोलिसांनी कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक समीरशेख , उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्पाचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाव्ठ , पोलीस अंमलदार भास्कर केंद्रे संतोष राऊत,पो. सचिन आगलावे यांनी कली. फरार आरोपीचा शोध सुरु आहे.

## अंबाजोगाईत मोठी घरफोडी : 24 लाख 80 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी केला लंपास...!

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरातील बँक कॉलनी परिसरात एका व्यापाऱ्याचे बंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण 24 लाख 80 हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

बँक कॉलनी परिसरातील रहिवासी व कापड व्यावसायिक गुलाबचंद हनुमानदास सारडा (वय – 56) यांचे घर दि. 17 सप्टेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता ते 19 सप्टेंबर रोजी सकाळी 9 वाजेपर्यंत बंद होते. याच कालावधीत अज्ञात चोरट्यांनी घराच्या लोखंडी गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर पाठीमागील दरवाजाचे कुलूप व बेडरूममधील कपाटाचे लॉक तोडून कपाटात ठेवलेले सोन्या – चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. या चोरीत सोन्या – चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण 24 लाख 80 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी दि. 20 सप्टेंबर रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे करीत आहेत.

## रायगडावर 24 सप्टेंबरला दशनाम गोसावी समाजाचा भव्य मेळावा

**माजलगाव :** अखंड हिंदुस्थानाचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दि. २४ सप्टेंबर रोजी किल्ले रायगडावर दशनाम गोसावी समाजाच्या वतीने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात दशनाम गोसावी समाजाचे आद्यगुरू महंत निश्चलपुरी महाराज यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती, अशी समाजाची श्रद्धा आहे.

या ऐतिहासिक सोहळ्याच्या स्मरणार्थ रायगडावर होणाऱ्या कार्यक्रमास महाराष्ट्रातील विविध भागांतून दशनाम गोसावी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. समाजबांधवांना मार्गदर्शन करण्यासाठी दशनाम गोसावी समाज परिषदेचे राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी, संस्थापक अध्यक्ष ॲड. राजेंद्र बन तसेच ह.भ.प. महंत दत्ता महाराज गिरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला अभिवादन करण्याबरोबरच समाजाची एकजूट, सामाजिक संघटन आणि पुढील दिशा याबाबतही यावेळी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यातील दशनाम गोसावी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने रायगडावर उपस्थित राहून ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन मराठवाडा अध्यक्ष भास्कर गिरी यांच्या सह , प्रा. लक्ष्मण गिरी, प्रा. तात्या पुरी, दिगंबर गिरी, सुधाकर भारती, आसाराम गिरी, संजीव भारती, रवि बन, दशनाम गोसावी समाज परिषदेचे, महादेव गिरी, अमित गिरी (माजलगाव), सुरेश गोसावी पुरी चिखली,भीमाशंकर गिरी,सूर्यकांत गिरी (माजलगाव), बाजीराव गिरी सर, बालाजी पुरी (आंबेजोगाई), विश्वंभर गिरी, मच्छिंद्र बन (बीड) अशोक पुरी आळंदी, राम गिरी आळंदी, कैलास गिरी आळंदी, विष्णू गिरी पुणे, यांनी केले आहे.

## आ. विजयराजे पंडित यांच्या हस्ते प्रभाग 12 व 14 मध्ये रॅलीसह विविध मंडळांच्या गणपतींची आरती संपन्न



बीड । प्रतिनिधी

गणेशोत्सवानिमित्त आमदार विजयसिंह पंडित यांनी बीड शहरातील प्रभाग क्र.14, व 12 मध्ये विविध ठिकाणी गणेश मंडळांना भेटी देत श्रीगणेशाची आरती मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाल्या, नगरसेवक भैय्यासाहेब मोरे रंजीत बनसोडे प्रमोद शिंदे, यांनी तगडे नियोजन केले होते यावेळी त्यांनी गणेशभक्त तसेच परिसरातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या विविध अडचणी जाणून घेतल्या. आमचे तीनही नगरसेवक मोरे, बनसोडे, शिंदे सक्रिय असतात,तसेच मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवर चर्चा करून नगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले.

यावेळी संतोष मानुरकर, निवृत्ती डोके सर, रामचंद्र निर्मळ सर, करपे सर, भालेकर बप्पा, कुलकर्णी काका, देवबाप्पा पारगावकर काका, मिठन्नसेट कोटुळे,लोंढे, आगलावे, शिंदे, घोडके, मोरे, काशीद , नाईकवाडे, सातपुते, पाठक, सोने, अजबे, ठोसर, वाघमारे, उत्कर्ष,यांच्यासह मंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. तसेच सभापती आरती बनसोडे, नगरसेविका सीता ताई मोरे, चक्रे ताई व भागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आ. विजयसिंह पंडित यांनी नाथ सृष्टी-लोढा नगरी गणेश मंडळ, अंकुश नगर गणेश मित्र मंडळ, शिवगर्जना गणेश मित्र मंडळ (धानोरा रोड), भालचंद्र गणेश मित्र मंडळ (संत नामदेव नगर), काळभैरव गणेश मित्र मंडळ (संत नामदेव नगर पूर्व), नाथ गणेश मित्र मंडळ (बंकट स्वामी कॉलनी), पालवन चौक, दक्षिणमुखी हनुमान गणेश मित्र मंडळ (पालवन रोड) तसेच नक्षत्र गणेश

गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना परिसरातील रस्ते, पाणी, स्वच्छता, पथदिवे तसेच इतर नागरी सुविधांबाबत नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांची आमदार पंडित यांनी माहिती घेतली. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे त्यांनी यावेळी सांगितले.या प्रसंगी, नगरपालिकेचे नगरसेवक भैय्यासाहेब मोरे, नगरसेवक रंजीत बनसोडे,नगरसेवक प्रमोद अण्णा शिंदे, नगरसेवक दत्ताभाऊ जाधव, गणेश तांदळे, प्रभाकर पोपळे, अजिंक्य पांडव, राम शेळके, गजानन जवकर, जटाळ, राम शेळके, गजानन जवकर, संदीप पाटील यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकसंवाद मोहिमेअंतर्गत बीड शहरातील सावता गणेश मंडळ येथे उपक्रम



**बीड दि. 22 (जिमाका) :** गणेशोत्सवाच्या कालावधीत सर्वसामान्यांना घरपोच आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने लोकसंवाद मोहिमेअंतर्गत राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्यावतीने संपूर्ण राज्यभरात 'श्रीगणेशा आरोग्याचा' हे विशेष अभियान राबवले जात आहे. जिल्ह्यातही 'श्रीगणेशा आरोग्याचा " या संकल्पनेंतर्गत सलग १० दिवस विविध शासकीय रुग्णालये महात्मा फुले जन आरोग्य योजना व मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत खासगी वैद्यकीय संस्था तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये मोफत आरोग्य तपासणी आणि उपचार सेवा सुरू करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविला जात आहे.

**या अभियानांतर्गत शासकीय आणि खासगी वैद्यकीय संस्थांच्या सहकार्याने पुढील तपासण्या मोफत केल्या जात आहेत:**

* सामान्य शारीरिक तपासणी व औषधोपचार
* रक्तदाब (BP) आणि मधुमेह (Sugar) तपासणी
* कर्करोग (Cancer) प्राथमिक तपासणी
* ईसीजी (ECG) व आवश्यक रक्तचाचण्या
* असंसर्गजन्य आजारांचे (NCD) प्राथमिक निदान


गावोगावी आरोग्य यंत्रणा सज्ज

जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शहरी आरोग्य केंद्रे तसेच 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या सर्व केंद्रांवर ही मोफत तपासणी सुरू आहे. यासोबतच गर्दीच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये विशेष आरोग्य शिबिरे भरवण्यात येत असून मंडळांकडूनही याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

बीड जिल्ह्य अंतर्गत मा. जिल्हाधिकारी श्री विवेक जॉनसन , निवासी जिल्हाधिकारी श्री शिवकुमार स्वामी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ सतीश सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शना नुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष बीड येथील डॉ चैतन्य कागदे यांनी जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळा पर्यंत आरोग्याचा जागर पोहचवण्याचे नियोजन आखले आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**अहवाल :** बीड जिल्हा श्री गणेशा आरोग्याचा अभियान-2026
मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, बीड
**दिनांक :** 14 ते 21/09/2026
शिबिरांचा आढावा
**एकूण शिबिरे :** 553
**एकूण रुग्ण :** 26171
**एकूण पुरुष :** 11795
**एकूण महिला :** 10958
**बालके :** 3418

## ज्येष्ठ पत्रकार परमेश्वर गित्ते यांचा पत्रकारिता सेवा गौरव पुरस्काराने सन्मान



**अंबाजोगाई :** त्रिदल नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार परमेश्वर गित्ते यांना त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'पत्रकारिता सेवा गौरव पत्रकारिता पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

पत्रकारिता क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, जनसामान्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे तसेच समाजहिताच्या विविध विषयांवर निर्भीडपणे लेखणी चालविणाऱ्या परमेश्वर गित्ते यांच्या कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला.

यावेळी सायं. दैनिक बीड निक सिटीझनचे अंबाजोगाई प्रतिनिधी शेख फिरोज यांनी ज्येष्ठ पत्रकार परमेश्वर गित्ते यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पत्रकारिता क्षेत्रातील अनुभवी पत्रकाराचा झालेला हा सन्मान म्हणजे त्यांच्या प्रदीर्घ पत्रकारिता सेवेचा गौरव असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या सन्मानामुळे पत्रकारिता क्षेत्रातील विविध मान्यवर, पत्रकार आणि मित्रपरिवारातून परमेश्वर गित्ते यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### प्रख्यात कवी विठ्ठल वाघ यांना भगवानराव लोमटे पुरस्कार प्रदान

## मराठवाड्याच्या पाण्याचा बॅकलॉग कधी निघणार : कवी विठ्ठल वाघ

**अंबाजोगाई :** प्रख्यात कवी तथा निवृत्त प्राचार्य विठ्ठल वाघ यांना कै. यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीच्या वतीने दिला जाणारा भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्यात कुठलेही सरकार आले तरी मराठवाड्याचा पाण्याचा बॅकलॉग अद्याप भरून निघाला नाही अशी खंत विठ्ठल वाघ यांनी व्यक्त केली.



लेखक तथा विचारवंत माजी प्राचार्य डॉ. विश्वास पाटील, ज्येष्ठ पत्रकार अशोकराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. समितीचे सचिव दगडू लोमटे, उपाध्यक्ष कमलाकर कांबळे, प्रभा विठ्ठल वाघ यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कवी विठ्ठल वाघ आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, की अंबाजोगाई हे माझे श्रद्धेचे ठिकाण आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराचा वारसा जोपासत शहराला सांस्कृतिक उभारी देण्याचे काम कै. भगवानराव लोमटे यांनी केले. कवितेने जगाला नव, नवी सृष्टी दिली. ही कवीता आपण जीव ओतून लिहितो, असे सांगून शेतकऱ्यांच्या वेदना मांडणारे भाष्य त्यांनी केले. या राज्यातील शेतकरी वर्ग अद्याप उपेक्षितच राहिला आहे. यावर्षी तर विदर्भ व मराठवाड्यात बिकट आवस्था. शेतकरी अडचणीत आहे. मराठवाड्याला त्यांच्या वाट्याचे पाणी मिळाले असते, तर आज ही आवस्था झाली नव्हती. राज्यात एकाच भागाला पाणी मिळते आणि दुसरा तहानलेला ही आवस्था बदलली पाहिजे अशी अपेक्षा विठ्ठल वाघ यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या वेदना व दुःख मांडणाऱ्या कवीता सादर केल्या.

राजकारण हे सामाजिक उथ्थानाचे गमक असावे अशी धारणा असणारे यशवंतराव यांचे व्यक्तीमत्व होते. त्यांना भाषेचा विवेक जोपासता आला. त्यांचे चिंतन व वाचन आज दुर्मीळ आहे. भगवानराव लोमटे यांनीही ममत्व जागवले, या जगात स्मित, आश्रु, आणि स्पर्शाची भाषा कायम राहणार असल्याचा विश्वास डॉ. विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

अशोकराव देशमुख यांनी कै. भगवानराव लोमटे यांच्या आठवणींना उजाळा दिला. राजकारणात सर्वसमावेशक भूमिका त्यांची होती. जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांचे योगदान होते. दोन वेगवेगळ्या विचाराची माणसे जुळवण्याचे काम त्यांनी केले. काम करून घेण्याचे त्यांचे कसब होते. अशा आठवणी श्री. देशमुख यांनी सांगितल्या.

दगडू लोमटे यांनी प्रास्ताविकात यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या उपक्रमाची माहिती दिली. पाहुण्यांचा परिचय डॉ. कमलाकर कांबळे यांनी दिला. सूत्रसंचालन प्रा. अंबादास फटांगरे यांनी करून आभार मानले.

## नेत्रतज्ज्ञ डॉ.एकनाथ शेळके यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार' प्रदान

**अंबाजोगाई :** स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाईचे नेतृत्व करणारे प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ.एकनाथ शेळके यांच्या दीर्घकाळच्या सेवाभावी व सामाजिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार-२०२६' १७ सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे प्रदान करण्यात आला.

बीड जिल्ह्यातील किल्ले धारूर येथील सामान्य कुटुंबातून वैद्यकीय शिक्षण घेत डॉ.शेळके यांनी गोरगरीब व गरजू रूग्णांची सेवा करण्याचे ध्येय जोपासले. एमबीबीएस व एमएस (नेत्र शल्यचिकित्सा) शिक्षणानंतर त्यांनी सन २००७ पासून पुणे येथील शासकीय रूग्णालयापासून अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयापर्यंत आपल्या सेवाकार्याचा विस्तार केला. नेत्ररोगांच्या उपचारांसोबतच रूग्णांच्या मनातील भीती, वेदना व असहाय्यता समजून घेऊन त्यांना दिलासा देण्याचे संवेदनशील कार्य त्यांनी केले आहे. अंबाजोगाई, केज, धारूर तसेच ग्रामीण भागातील खेड्यापाड्यांत जाऊन मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू निदान शिबिरांच्या माध्यमातून हजारो गरजू रूग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया करून त्यांना नवी दृष्टी देण्याचे कार्य त्यांनी केले. सन २००६ ते २०२५ या प्रदीर्घ कालावधीत लाखो रूग्णांची तपासणी, योग्य उपचार तसेच शस्त्र क्रियेसंदर्भात मार्गदर्शन करून त्यांनी नेत्रसेवेच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांना मोठा आधार दिला. विविध सामाजिक उपक्रम व वैद्यकीय शिबिरांमध्ये विनामूल्य सेवा देत त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविला. वैद्यकीय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासोबतच 'मोतीबिंदूमुक्त बीड जिल्हा' करण्याचा संकल्पही त्यांनी केला आहे. त्यांच्या अखंड व अतुलनीय नेत्रसेवेचा गौरव म्हणून मराठवाडा समन्वय समिती, पुणे यांच्या वतीने त्यांना 'मराठवाडा भूषण पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल डॉ.एकनाथ शेळके यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.



सोयाबीन मलणी करतांना शेतकरी अल्प पाऊस पडल्याने सोयाबीन पिकातून खच निघणे आवघड झाले आहे शेतकरी यामुळे खूपच अडचणीत आहे.

## १,४०० अर्जदारांच्या नोकरभरतीवर प्रश्नचिन्ह; भरती प्रक्रिया रद्द करण्याची मागणी

### स्वाभिमानी संघटनेचे संपर्कप्रमुख मनोज भैया कदम यांच्या नेतृत्वाखाली स्वारातीर्थच्या अधिष्ठात्यांना निवेदन

**अंबाजोगाई :** स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे स्मार्ट कंपनीमार्फत करण्यात येणाऱ्या नोकरभरती प्रक्रियेवर आक्षेप घेत स्वाभिमानी संघटना महाराष्ट्रचे संपर्कप्रमुख मनोज भैया कदम यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.



या भरतीसाठी अंबाजोगाई परिसरातील सुमारे १,४०० महिला, विद्यार्थी व युवकांनी अर्ज केले होते. मात्र, भरती प्रक्रियेदरम्यान अचानक काही उमेदवारांची निवड यादी जाहीर करण्यात आल्याने इतर अर्जदारांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. जाहीर करण्यात आलेली निवड यादी व संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक नसल्याचा आरोप निवेदनकर्त्यांनी केला असून, सदर भरती प्रक्रिया रद्द करून नव्याने पारदर्शक पद्धतीने भरती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

मनोज भैया कदम यांच्या नेतृत्वाखाली सर्व मित्रपरिवार व संबंधित अर्जदारांनी एकत्र येत स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना निवेदन दिले. भरती प्रक्रियेतील निवड निकष, अर्जदारांची गुणवत्ता, निवड यादी तयार करण्याची पद्धत तसेच संबंधित कंपनीची भूमिका याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी निवेदनकर्त्यांनी "मोठ्यांचा आला गाडा आणि गरिबांचे घर मोडा" असा आरोप करत, आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्या युवकांना रोजगाराच्या संधींपासून दूर ठेवले जात असल्याची भावना व्यक्त केली.

दरम्यान, निवड प्रक्रिया प्रत्यक्षात बोगस असल्याचा आरोप करण्यात आला असला तरी, त्याबाबत अधिकृत चौकशीचा निष्कर्ष अथवा संबंधित प्रशासनाची भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे.

पारदर्शक भरती, सर्व अर्जदारांना समान संधी आणि निवड प्रक्रियेची चौकशी या प्रमुख मागण्यांसाठी देण्यात आलेल्या या निवेदनामुळे अंबाजोगाईतील संबंधित नोकरभरतीचा मुद्दा चर्चेत आला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## सुनावणी प्रक्रिया गुणवत्तापूर्ण व पारदर्शक पद्धतीने राबवा
### उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांचे निर्देश

**अहिल्यानगर, दि. २२ :** मतदार यादीतील जुळवणी न झालेले तसेच तार्किक विसंगती असलेल्या मतदारांना नोटिसा बजावून त्यांची सुनावणी घेण्याची प्रक्रिया सध्या संपूर्ण जिल्ह्यात सुरू आहे. ही सुनावणी विहित नियमांनुसार, गुणवत्तापूर्ण आणि पारदर्शक पद्धतीने पार पडेल, याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी दिले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्यामार्फत घरोघरी भेट देऊन प्रारूप मतदार यादी नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर जुळवणी न झालेले आणि तार्किक विसंगती असलेल्या मतदारांना नोटिसा बजावण्याचे तसेच त्यांची सुनावणी घेण्याचे काम सुरू झाले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात १ लाख ३२ हजार ८३३ जुळवणी न झालेले आणि १ लाख ५९ हजार ६१६ तार्किक विसंगती असलेले, असे एकूण २ लाख ९२ हजार ४४९ मतदार आहेत. या मतदारांना नोटिसा बजावण्याची कार्यवाही विविध विधानसभा मतदारसंघांमध्ये सुरू आहे.

पारनेर विधानसभा मतदारसंघात जुळवणी न झालेले ११ हजार ४८६ आणि तार्किक विसंगती असलेले १३ हजार ३२८, असे एकूण २४ हजार ८१४ मतदार असून, त्यांना नोटिसा बजावण्याचे काम नुकतेच सुरू करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर पारनेर येथे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना गाढे यांनी सर्व संबंधित मतदारांना वेळेत नोटिसा पोहोचतील, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले. तसेच सुनावणीचे कामकाज विहित पद्धतीने आणि गुणवत्तापूर्ण रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांच्या तांत्रिक व प्रशासकीय स्वरूपाच्या शंकांचे निरसन उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे आणि निवडणूक नायब तहसीलदार श्रीकांत लोमटे यांनी केले.

बैठकीस मतदार नोंदणी अधिकारी तथा प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसीलदार गायत्री सौंदाणे, निवडणूक शाखेचे नायब तहसीलदार विशाल सदनापूर, अभिजित रायकवाड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीनंतर गाढे यांनी तहसील कार्यालयात सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेऊन सुनावणी प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी स्थानिक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

नोटिसा बजावण्याच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी गाढे यांनी ढवळपुरी गावास भेट दिली. यावेळी त्यांनी स्थानिक BLO यांच्या कामकाजाची माहिती घेतली. त्यांच्या उपस्थितीत स्थानिक मतदारांना नोटिसा बजावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली. यावेळी ग्रामस्थ तसेच ढवळपुरी ग्रामपंचायतीचे सरपंच आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

## एआय प्लस नोव्हा 2 पॉवर उच्च कार्यक्षमतेसह

**छत्रपती संभाजीनगर, :** एआय प्लस ने नोव्हा 2सिरीज मधील नवीनतम स्मार्टफोन नोव्हा 2 पॉवर 5जी लॉंच केला आहे. अत्याधुनिक डिझाइन, विश्वासार्ह कार्यक्षमता आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी पॉवर यांचा संगम असलेला हा स्मार्टफोन तंत्रज्ञानप्रेमी नव्या पिढीच्या गरजा लक्षात घेऊन सादर करण्यात आला आहे. पारंपरिक स्मार्टफोन लॉन्चच्या पद्धतीपेक्षा वेगळ्या आणि अनोख्या पद्धतीने, नोव्हा 2 पॉवर ने नवी दिल्लीतील रॅम्पवर पदार्पण करत फॅशन आणि तंत्रज्ञानाचा सुरेख संगम सादर केला. आधुनिक रॅम्प लुक्समध्ये हा स्मार्टफोन समाविष्ट करण्यात आला होता, ज्यातून तो केवळ तंत्रज्ञानाचे उपकरण नसून स्टायलिश ॲक्सेसरी म्हणूनही आपली ओळख अधोरेखित करतो.

## मिराजिओने नवी मुंबईत आपले पहिले स्टोअर सुरु

**मुंबई :** भारताच्या आघाडीच्या हँडबॅग आणि ॲक्सेसरीज ब्रँड्सपैकी एक असलेल्या मिराजिओने नवी मुंबईतील वाशी येथील इनऑर्बिट मॉलमध्ये आपले दुसरे स्टोअर सुरू केले आहे. या उद्घाटनासह मिराजिओने मुंबई महानगर प्रदेशात प्रवेश केला असून, हा देशातील फॅशन आणि रिटेल क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा आणि लक्षवेधी बाजारपेठांपैकी एक आहे. या नव्या स्टोअरच्या माध्यमातून मिराजिओचा डिजिटल-फर्स्ट ब्रँडपासून प्रत्यक्ष रिटेल नेटवर्क उभारणाऱ्या ब्रँडकडे होणारा प्रवास अधिक दृढ झाला आहे. आतापर्यंत ज्यांनी मिराजिओला केवळ ऑनलाइन माध्यमातून पाहिले किंवा अनुभवले आहे, अशा ग्राहकांना आता प्रथमच मिराजिओच्या उत्पादनांचा प्रत्यक्ष स्टोअरमध्ये अनुभव घेता येणार आहे.

## ऑफशोअर पवन ऊर्जा आणि रिपॉवरिंगवर लक्ष

मुंबई — आपल्या मूळ स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टासोबतच एक औद्योगिक आणि निर्यात शक्ती म्हणून वेगाने विकसित होत असलेले भारताचे पवन ऊर्जा क्षेत्र विंडर्जी इंडिया 2026 मध्ये केंद्रस्थानी असेल. "पवन – भारताच्या ऊर्जा लवचिकतेला बळ देणे" या संकल्पनेवर आधारित हा ऐतिहासिक 8वा अंक देशाच्या नवीकरणीय ऊर्जा परिदृश्यात अभूतपूर्व गतीच्या काळात आयोजित होत आहे."भारताचे ऊर्जा संक्रमण आता केवळ मेगावॅट जोडण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. हे एक संपूर्ण औद्योगिक परिसंस्था उभारण्याबद्दल आहे — जी कुशल रोजगार निर्माण करते, उत्पादन निर्यातीला चालना देते, ऊर्जा सुरक्षिततेची हमी देते आणि आयातित व अस्थिर जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करून प्रणाली खर्च कमी करते," असे श्री. राजेश कुलहरी, सह-सचिव, एमएनआरई यांनी सांगितले

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक 'मूषक आला रे' उपक्रम

**पुणे:** यंदाच्या गणेशोत्सवात उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक 'मूषक आला रे' उपक्रमाच्या माध्यमातून बाप्पाला भाविकांच्या अधिक जवळ घेऊन येत आहे. गणपती बाप्पाचा लाडका मूषक भाविकांच्या मनातील इच्छा बाप्पापर्यंत पोहोचवतो, या श्रद्धेवर आधारित हा उपक्रम आखण्यात आला आहे.हा उपक्रम गणेशोत्सवाचा आनंद अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक बनवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि शारीरिक अडचणींमुळे गर्दीच्या मंडपांना भेट देणे कठीण जाणाऱ्या व्यक्तींसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

## गणेशोत्सव साजरा केला

सोनी सबवरील हस्तिनापुर के वीर पांडव आणि कौरवांच्या बालपणातील वर्षं जिवंत करतं, ज्यातून त्यांच्या आयुष्याला आकार देणाऱ्या मूल्यं आणि नात्यांचा प्रकाश टाकला जातो. कलाकार रोज सेटवर एकत्र वेळ घालवतात, पण उत्सवाच्या साजरीकरणामुळे त्यांना एक कुटुंब म्हणून एकत्र येण्याची संधी मिळते.

## पुष्पा इम्पॉसिबलच्या कलाकारांनी गणेश चतुर्थीचे स्वागत

सोनी सबचं पुष्पा इम्पॉसिबल आपल्या कलाकार आणि तांत्रिक टीमसोबत उत्सवाचा आनंद साजरा करत राहते, प्रत्येक प्रसंगाला एकत्र येण्याची संधी बनवते. सेटवर गणेश चतुर्थी साजरी करताना कलाकार आणि टीमने आनंद, सकारात्मकता आणि एकत्रतेची भावना कार्यस्थळी आणली.पुष्पा इम्पॉसिबलच्या सेटवर सगळ्यांनी मिळून सण साजरे करणं ही एक खास परंपरा झाली आहे. व्यस्त वेळापत्रकातून थोडा विराम घेऊन कलाकार आणि टीम एकत्र सजतात, उत्सवी क्षण शेअर करतात आणि एकमेकांसोबत वेळ घालवतात. आरतीसाठी एकत्र येणं, स्वादिष्ट प्रसादाचा आनंद घेणं अशा प्रसंगांमुळे टीममधील नातं अधिक घट्ट होतं आणि सेट खरंच कुटुंबासारखा वाटतो.

# हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते देवगिरी बँकेच्या गणरायाची आरती
## देवगिरी परिवारासाठी अभिमानाचा क्षण; गणेशोत्सवात भक्तिमय वातावरण

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी बँक कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने आयोजित गणेशोत्सवात राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या हस्ते श्री गणरायाची भक्तिभावाने आरती करण्यात आली. बँकेच्या वाटचालीशी असलेले बागडे यांचे जुने ऋणानुबंध आणि त्यांच्या हस्ते झालेली गणरायाची आरती यामुळे देवगिरी परिवारासाठी हा सोहळा विशेष ठरला.




हरिभाऊ बागडे यांनी एका छोट्या रोपट्याच्या रूपात स्थापन केलेल्या देवगिरी नागरी सहकारी बँकेचा आज विस्तार झाला आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्याच हस्ते गणरायाची आरती होणे हा देवगिरी परिवारासाठी अभिमानाचा आणि अविस्मरणीय क्षण ठरला.

आरतीप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत व्यवस्था प्रमुख पांडुरंग कुलकर्णी, देवजीभाई पटेल, अजय शहा, अभिषेक काठाळ, ललिताभाभी करवा, सी. एन. शर्मा, पदमसिंग राजपुरोहित, अंकित अग्रवाल, सुहास शिरसाठ, राजू शिंदे, राजू बागडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांच्यासह बँकेचे पदाधिकारी, कर्मचारी आणि देवगिरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी श्री गणरायाचे दर्शन घेत आरतीमध्ये सहभाग नोंदविला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, भक्तिभाव आणि सांस्कृतिक परंपरेचा जागर करण्यात आला. यावेळी सर्वांच्या सुख-समृद्धी व मंगलमय भविष्यासाठी श्री गणरायाच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

# वाळुज गणेश महासंघाच्या शिवमहापुराण कथेला भाविकांचा प्रतिसाद
## शिवमहापुराण कथाकार नवनाथ महाराज मस्के यांच्या सुश्राव्य वाणीतून साकारतेय कथा

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.२२:** वाळुज गणेश महासंघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य शिवमहापुराण कथेला भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळत असून, दररोज मोठ्या संख्येने भाविक कथा श्रवणाचा लाभ घेत आहेत. शिव महापुराण कथाकार नवनाथ महाराज मस्के यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवपुराण कथा सुरू असून, वाळूज परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.




शिवपुराण कथेच्या निमित्ताने दररोज विविध धार्मिक देखावे साकारण्यात येत आहेत. काल साकारण्यात आलेल्या देखाव्यात भगवान विष्णू, भगवान महादेव व माता पार्वती यांच्या रूपांचे दर्शन भाविकांना घडविण्यात आले. या देखाव्याने उपस्थित भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

कथा ऐकण्यासाठी परिसरातील महिला, पुरुष तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असून, धार्मिक वातावरणात शिवमहापुराण कथेचा आनंद घेत आहेत. महासंघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येत आहे.

यावेळी महासंघाचे अध्यक्ष सचिन जमधडे, उपाध्यक्ष जमील पटेल, ललित राऊत, सचिव कृष्णा अग्रवाल, अध्यक्ष सचिन काकडे, योगेश आरगडे, कोषाध्यक्ष संतोष आरगडे, सचिन पानकडे, पवन राजपूत, अक्षय राजपूत, विनोद करमाशे, मनोज पिंपळे, नंदू राऊत, सर्जेराव भोड, अनिल भुजंग, काकासाहेब चापे, माणिकदादा राऊत तुळशीराम दाणे तसेच संस्थापक अध्यक्ष बबन गायकवाड यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गणेश विसर्जनस्थळी सुविधा सक्षम करा; आयुक्त येडगे यांच्या सूचना
## नागरिकांनी जास्तीत जास्त मूर्तीदान केंद्रांचा वापर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी मंगळवारी शहरातील विविध विसर्जन विहिरी व कृत्रिम तलावांची पाहणी केली. विसर्जनस्थळी नागरिकांची सुरक्षितता, प्रकाश व्यवस्था आणि आवश्यक सुविधांची उपलब्धता याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.



नागरिकांना त्यांच्या परिसरातील जवळचे विसर्जनस्थळ सहज उपलब्ध व्हावे, यासाठी क्यूआर कोड तयार करण्याचे निर्देश आयुक्त येडगे यांनी दिले. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर नागरिकांना जवळील विसर्जन विहीर, कृत्रिम तलाव तसेच मूर्तीदान संकलन केंद्राची माहिती मिळणार आहे.

महानगरपालिकेच्या वतीने शहरात एकूण ४७ मूर्तीदान संकलन केंद्रे उभारण्यात येत आहेत. नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी गणेशमूर्तींचे मोठ्या प्रमाणात मूर्तीदान केंद्रांवर दान करावे, असे आवाहन आयुक्त येडगे यांनी केले. केंद्रांवर जमा झालेल्या मूर्तींचे विधिवत पूजन करून औपचारिक विसर्जन करण्यात येणार असून, त्यानंतर या मूर्ती मूर्तिकारांकडे सुपूर्द केल्या जाणार आहेत.

आयुक्तांनी जिल्हा परिषद मैदान, संभाजी पेठ, एन-१२, राजीव गांधी स्टेडियम, शिवाजीनगर तसेच देवळाई तलाव येथील विसर्जनस्थळांची पाहणी केली. प्रकाश व्यवस्था अधिक सक्षम करण्यासह नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त शहर अभियंता अमोल कुलकर्णी यांच्यासह संबंधित अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# गणेशोत्सव पार्श्वभूमीवर सोयगाव शहरात पोलीसांचा रूट मार्च

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ सप्टेंबर

गणेशोत्सच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस तैनात झाले आहे त्यासाठी शहरात शांततेचे आवाहन करत सोमवार रोजी (दि.२१) ४ वाजता सोयगाव शहरातून एस आर पी एफ नागपूर पथकाद्वारे पोलीसांनी रूट मार्च काढला.यावेळी छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव,

अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी,उपविभागीय सिल्लोड विश्वजीत काईंगडे,यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील छत्रपती शिवाजी चौक,जूना बाजार पट्टा, सोयगाव बसस्थानक परिसर, व्यापारी गल्ली आदी भागातून सोयगाव पोलीसांचा रूट मार्च निघाला यावेळी गणेशोत्सव काळात शहर वासियांनी शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी केले



शहरातील विविध भागातून हा रूट मार्च काढण्यात आला होता यावेळी पोलीसांनी शहरातील गणेश भक्तांना शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. यावेळी पोलीस सफौ इसरार मिर्झा, दिपक फरकांडे, आकाश कुंडकर,ज्ञानेश्वर दांडगे,नारायण जिरी,गजानन दांडगे,अजय कोळी,पवन तायडे,सादिक तडवी,कुणाल जाधव,समाधान बारी,अनिल तांगडे, विजय शेजवळ, होमगार्ड आदींसह पोलीस कर्मचारी यांनी शहरातून रूट मार्च काढला होता.....

गणेशोत्सवा साठी सोयगाव शहरासोबत हद्दीतील गावात कडेकोट बंदोबस्त असून २४ तास पोलीस तैनात करण्यात आले आहे सध्या स्थानिक पोलीस ठाण्याचे दोन अधिकारी, १५ कर्मचारी व २८ गृहरक्षक दल याप्रमाने शहर व हद्दीतील गावात बंदोबस्त तैनात करण्यात असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी सांगितले.

# ग्रामसभा वाचवा आंदोलनाला पहिल्या टप्प्यात यश; सहाव्या दिवशी उपोषण स्थगित
## पंचायत समिती स्तरावरील तीन मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही

तभा वृत्तसेवा

**वाघोळा, ता. फुलंब्री :** ग्रामस्तरावरील शासकीय कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी, हजेरीनुसार वेतन, ग्रामसभा वाचवा यासह ग्रामविकासाच्या विविध १५ मागण्यांसाठी वाघोळा येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाला पहिल्या टप्प्यात यश मिळाले. पंचायत समिती स्तरावरील तीन मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही झाल्यानंतर सहाव्या दिवशी विकास शेषराव गायकवाड व सचिन श्रीमंत गायकवाड यांनी उपोषण स्थगित केले.




मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने १७ सप्टेंबर रोजी दोघांनी आमरण उपोषण सुरू केले होते. आंदोलनाला वाघोळा ग्रामस्थांचा मोठा पाठिंबा मिळाला. पंचायत समिती स्तरावरील तीन मागण्यांवर कार्यवाही करण्यात आली असून, जिल्हा व राज्यस्तरावरील धोरणात्मक मागण्या पुढील कार्यवाहीसाठी संबंधित वरिष्ठ कार्यालयांकडे पाठविण्यात आल्या आहेत.

या मागण्यांसाठी पंचायत समिती स्तरावरून पाठपुरावा करण्याचे लेखी आश्वासन सभापती सर्जेराव पाटील मेटे व गटविकास अधिकारी प्रसाद खेडेकर यांनी दिले. त्यानंतर सभापतींच्या हस्ते ज्यूस घेऊन आंदोलकांनी उपोषण स्थगित केले.

दरम्यान, आंदोलनाची माहिती गावागावातील ग्रामविकास कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पत्रकारांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आंदोलकांनी आभार मानले. जिल्हा व राज्यस्तरावरील मागण्यांवर लवकर कार्यवाही न झाल्यास छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पुन्हा उपोषण करण्याचा इशारा विकास गायकवाड व सचिन गायकवाड यांनी दिला.

"आज उपोषण स्थगित झाले आहे, लढा नाही. गरज पडल्यास महाराष्ट्रातील गावागावातून आवाज उठवू," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## सोयगाव भाजपा शहर नवनियुक्त कार्यकारिणी पदाधिकारी यांचा सत्कार समारंभ सोहळा संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ सप्टेंबर

नुकत्याच जाहीर झालेल्या भारतीय जनता पार्टी सोयगाव शहर कार्यकारणी पदाधिकारी यांचा सत्कार समारंभ जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्या निवासस्थानी माजी नगराध्यक्ष कैलास काळे व तेजस्विनीताई काळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भाजपा शहर अध्यक्ष मंगेश सोहनी,भाजपा शहर उपाध्यक्ष अतुल चौधरी,महेश मानकर,ॲड.शुभम आगे,विपीन काळे,सुनील इंगळे,मनोज चौधरी,प्रसाद पठाडे, भाजपा शहर सरचिटणीस संजय मोरे,अजय पाटील,दिपक बनकर,भाजपा शहर चिटणीस गणेश गव्हांडे,ईश्वर परदेशी, आनिता तडवी,नाना घुले,अमोल कोरडे,सचिन देसले,मोर्चा आघाडे शहर अध्यक्ष मयूर मनगटे,सविताताई जावळे, गजानन देसाई,राहुल परदेशी,हरीश सोहनी,समाधान सोनवणे,कोषा अध्यक्ष निलेश नागपुरे,यावेळी जिल्हाचिटणीस सुनील गावंडे,प्रमोद पाटील,विजय गव्हाड, गजानन चौधरी व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. तर या निवड फेरनिवड झाल्याबद्दल पक्षाचे सर्व ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे,मंत्री अतुल सावे, भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे,जिल्हा अध्यक्ष सुरेश बनकर पाटील,ज्ञानेश्वर मोठे,सुनील मिरकर,जिल्हा सरचिटणीस सुनील गावंडे,सोयगाव शहर अध्यक्ष मंगेश सोहनी,कैलास काळे,वसंत आप्पा बनकर,राजेंद्र जावळे, योगेश पाटील,प्रमोद पाटील,सुनील ठोंबरे,संजय मोरे,अजय पाटील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी नवीन पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## त्रिशूल मित्र मंडळाचा आदि योगी देखावा गणेश भक्तांसाठी ठरला आकर्षण

राहाता ( वार्ताहर ) येथील त्रिशूल मित्र मंडळाने स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त साकारलेला अदि योगी हा देखावा गणेश भक्तांसाठी आकर्षक ठरला असून गणेश उत्सवा निमित्त मंडळाने आयोजित केलेल्या सर्व रोग निदान शिबिर ,नेत्र तपासणी , राहाता पोस्ट कार्यालय मार्फत आधारकार्ड अपडेटेशन, नारी शक्तीचा जागर, माहिती प्रसारण कार्यालयाच्या वतीने शासनाच्या विविध योजनांची माहिती असे विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून शिस्तबद्ध पद्धतीने गणेश उत्सवाचे आयोजन केले. राहाता शहरात शिस्तप्रिय मंडळ म्हणून ओळख असणारे त्रिशूल मित्र मंडळांनी यावर्षी सुवर्ण महोत्सव म्हणजेच ५० वर्ष गणेश स्थापनेला झाल्याने भव्य २१ फुटी आधी योगी हा देखावा सादर करून शहर व परिसरातील गणेश भक्तांचे लक्ष वेधले. मित्र मंडळ हे शहरात शिस्तप्रिय व विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवणारे मंडळ म्हणून ओळखले जाते. त्यामुळे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील , भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुजय विखे पाटील यांच्यासह तालुक्यातील विविध शासकीय अधिकारी या मंडळाच्या विविध सामाजिक उपक्रमाला आवर्जून भेट देऊन त्यांच्या कामाची कौतुक करतात.

**जीआयसी हाऊसिंग फायनान्स लि.**

गृहे सौख्यम् विराजते

निगम कार्यालय/मुख्य कार्यालयः जीआयसीएचएफएल, नॅशनल इन्शुरन्स बिल्डिंग, ६वा मजला, १४, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.
दूर.: ०२२-४३०४१९०० ईमेल : corporate@gichf.com वेबसाइट : www.gichfindia.com

**सार्वजनिक सूचना**

**छत्रपती संभाजीनगर येथे शाखा सुरू करण्याबाबत सूचना**

सर्वसामान्य जनता, जीआयसीएचएफएलचे ग्राहक तसेच इतर सर्व संबंधितांना याद्वारे सूचित करण्यात येते की, खालील नमूद ठिकाणी जीआयसी हाऊसिंग फायनान्सची नवीन शाखा सुरू करण्यात येत आहे :

**छत्रपती संभाजीनगर शाखा**

पत्ता : फ्रीडम टॉवर, डी-६२०, सहावा मजला, आकाशवाणीच्या बाजूला, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००१.

सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, कृपया याची नोंद घ्यावी. सदर शाखा दिनांक २३.०९.२०२६ पासून कार्यान्वित होईल.

दिनांक : २३.०९.२०२६
ठिकाण : संभाजीनगर

सही/-
अधिकृत अधिकारी

**जाहिर नोटीस**

**भुसावळ येथील सह दिवाणी न्यायालय, व. स्तर यांचे न्यायालयात.**

हिंदु मेरेज पिटीशन क्र. 415/2025 — पु.ता. 31/10/2026
निशाणी क्रमांक - 17

श्री. राहुल प्रेमचंद इंगळे विरुध्द- अर्जदार
विरुद्ध
निकिता राहुल इंगळे- सा.वाली

प्रति,
निकिता राहुल इंगळे, रा. व्दारा दिपक देविदास वाघ, गांव- जरंडी, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर).

ज्याअर्थी, उपरिनामित अर्जदार यांनी या न्यायालयाकडे नि.१ चे नकलेप्रमाणे अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, याद्वारे तुम्हाला फर्मविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरुध्द कारण दाखवण्याकरिता दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता सह दिवाणी न्यायालय व. स्तर, भुसावळ या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलांमार्फत हजर व्हावे, तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी बजावणीकरिता पत्ता देण्यास कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

दिली. आज दिनांक १९/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

हुकूमावरुन
सहाय्यक अधीक्षक
सह दिवाणी न्यायालय,व स्तर भुसावळ

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ.संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. 675/2026 — पु.ता.22/10/2026

अर्जदारः- १. जिजाबाई भिकचंद कोन्हाळे, वय ८० वर्ष धंदा. शेती २. हरिभाऊ भिकचंद कोन्हाळे, वय ५१ वर्ष धंदा. शेती ३. संजय भिकचंद कोन्हाळे, वय. ५० वर्ष धंदा. शेती ४. कचरू भिकचंद कोहाळे वय ४२ वर्ष धंदा शेती १ ते ४ रा. तांदुळवाडी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ५. द्वारकाबाई बबन मात्रे, वय. ४९ वर्ष धंदा. शेती रा. पेंडापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

- विरूद्धः-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की,

असे की, अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ ते ५ यांची वडिल नामे भिकचंद सखाराम कोन्हाळे हे दि. १८/०९/२००९ रोजी मौजे तांदुळवाडी ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर येथे मयत झाले आहेत व अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत भिकचंद सखाराम कोन्हाळे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत भिकचंद सखाराम कोन्हाळे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत भिकचंद सखाराम कोन्हाळे याचे वारस प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत भिकचंद सखाराम कोन्हाळे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत भिकचंद सखाराम कोन्हाळे यांचे वारस असल्याने वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतर येणार आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या

सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

**जाहिर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९६/२०२६.

अर्जदार :-१)गिरीश वसंतराव जगताप, वय. ६१ वर्षे, धंदा. सेवा निवृत्त, २)जगदिश वसंतराव जगताप, वय. ५६ वर्षे, धंदा, नौकरी, ३) सुरेंद्र वसंतराव जगताप, वय. ५४ वर्षे, धंदा. मजुरी, सर्व रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि, छत्रपती संभाजीनगर, 4) स्नेहलता किशोर वारुडे, वय. ६३ वर्षे, धंदा. घरकाम, रा. गोराणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

-विरुध्द-

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण- वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत वसंतराव हरी शिंपी (जगताप) हे दि. २५/०६/२०२३ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा वयोवृध्दपणांमुळे मृत्यु झालेला असून, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत वसंतराव हरी शिंपी (जगताप) यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासून ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख : २६/१०/२०२६. आज दि. २२/०९/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

विभागीय लिपीक, — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय ,क.स्तर, सोयगाव

## अग्रलेख

# राजनीतीवर टवाळांची टोळधाड !

सर्वसामान्य माणसे ज्याकडे राजनीती म्हणून पाहतात, त्यामधील नैतिकतेचा केव्हाच अस्त झाला असून राजकारणाची संस्कृतीदेखील आता लयास चालल्याने भविष्यात देशातील राजकारण कोणती वळणे घेणार याची चिंता करण्याची वेळ येऊ लागली आहे. एके काळी राजकारणाची संस्कृती जपली जात होती. विरोधाच्या राजकारणातही सभ्यतेची पातळी सांभाळली जात होती. त्यामुळेच, राजकारणाविषयी सर्वसामान्यांच्या मनात कुतूहल, उत्सुकता आणि आपुलकीदेखील होती. काळ बदलत चालला, तसतसा सामान्यांच्या मनातून राजकारणाविषयीचा आदर उतरत चालला आणि राजकारण किंवा राजकारण्यांकडे पाहण्याची दृष्टीदेखील बदलत गेली. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर किंवा सत्ताधाऱ्यांनी विरोधकांवर आरोप करणे, कुरघोडीचे राजकारण करणे ही राजकारणाची नीतीच असली तरीही त्या नीतीने आपल्या मर्यादा ओलांडल्या की रसातळाचा कोणता थर गाठला जातो, याचे ताजे उदाहरण लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे सर्वेसर्वा राहुल गांधी यांनी त्यांच्या ताज्या विद्यार्थी संवाद कार्यक्रमातून देशासमोर उघड केले. गेल्या काही महिन्यांपासून 'जेन-झी'ची मने जिंकण्यासाठी आणि त्याद्वारे मतांची बेगमी करण्यासाठी राहुल गांधींच्या माध्यमातून 'छात्रों की गूंज' नावाचा कार्यक्रम काँग्रेसद्वारे राबविला जात आहे. या कार्यक्रमात गोळा केल्या जाणाऱ्या गर्दीला 'जेन-झी' वयोमर्यादेची अट असतेच असे नाही. त्यामुळे केवळ गर्दीसाठी जमविल्या जाणाऱ्या सरसकट जमावासमोर राहुल गांधी यांनी संवादाच्या नावाखाली जे काही विचार मांडले, त्याचा फारसा प्रभाव तरुणाईच्या मनावर पडलेला दिसत नाहीच, उलट त्यांच्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रमांच्या मालिकेनंतरही काँग्रेसच्या सावलीतील विद्यार्थी संघटनांनाच नाकारण्याची मानसिकता जेन-झी मध्ये बळावत असल्याचे अलिकडेच पार पडलेल्या दिल्ली विद्यापीठातील निवडणुकांच्या निकालावरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, राहुल गांधींना तरुणांसमोर आणून काँग्रेस मतांची बेगमी करते, की काँग्रेसपासून तरुणांनी दूर राहावे यासाठी आटापिटा करते, याचे उत्तर भविष्यात मिळणार आहे.

राजकीय विरोधाला विनोदाची फोडणी देणे ही लोकशाहीने दिलेली मोकळीक आहे की राजकारणातील गांभीर्याचा ऱ्हास आहे, हा प्रश्न मध्य प्रदेशातील इंदूर येथे राहुल गांधी यांनी छात्रों की गूंज कार्यक्रमातील स्टँडअप कॉमेडियन पुलकित मणी याच्यासोबत झालेल्या 'हास्यजत्रे'मुळे ऐरणीवर आला आहे. एकमेकांचा अवमान आणि एखाद्याच्या पदाचा उपहास यांच्यामध्ये एक सूक्ष्म सीमारेषा असते. ती सीमारेषा पुसली गेली की राजकीय टीका अखेरीस तमाशाचा फड बनतो आणि व्यंगांची मर्यादा भंग होऊन ते केवळ स्वस्त विनोदाच्या पातळीवर उतरतात. इंदूरच्या राहुल गांधींच्या कार्यक्रमात नेमके हेच झाले, असा सत्ताधाऱ्यांचा आरोप आहे. ज्यांनी राहुल गांधी यांचा तो विनोदी कार्यक्रम पाहिला, प्रत्यक्ष अनुभवला, त्यांच्या मनातही याहून वेगळी भावना उमटली असेल असे नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लकबी, परदेशी नेत्यांसोबतच्या संवादाची शैली आणि काही शब्दांची खिल्ली यांचा आधार घेत इंदूरच्या कार्यक्रमात राहुल गांधी यांनी पुलकित होऊन सहभाग घेतला, तेव्हा लोकसभेतीलील विरोधी पक्षनेता या पदाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निश्चितच ऐरणीवर आला असेल. याआधीही एका जाहीर कार्यक्रमात राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी आणि इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांच्या संदर्भात अत्यंत घृणास्पद विनोद करून टीका केली तेव्हा जनतेमधील नापसंतीचा सूर बुहधा काँग्रेसपर्यंत पोहोचला नसावा. तसे असते, तर पुन्हा तसाच पांचट विनोद करून विद्यार्थ्यांना हसविण्याचा पोरकट प्रयत्न करण्याचा सल्ला राहुल गांधींच्या सल्लागारांनी त्यांना दिला नसता. आजची जेन-झी पिढी प्रगल्भ आहे, या पिढीच्या मनात व्यवस्थेविषयी काही स्पष्ट भावना आहेत आणि त्यामध्ये बदल घडविण्याचे ठोस मार्गदेखील त्यांच्यासमोर आहेत. अशा प्रगल्भ पिढीसमोर असे तिसऱ्या दर्जाचे हलके विनोद सादर करून त्यांद्वारे त्यांना आपलेसे करून घेण्याच्या प्रयत्नांत राजनीतीचे पतन आणि पक्षाच्या प्रतिमेवरील अविश्वासास हातभार लावण्यापलीकडे फारसे काही काँग्रेसच्या हाती लागण्याची शक्यता कमीच असतानाही, त्याच प्रकारांची पुनरावृत्ती करण्याचा अट्टहास ही विनाशकालातील विपरीत बुद्धी म्हणावी लागेल. काँग्रेसने राजनीतीची परंपरा जपली पाहिजे, त्या परंपरेला पोरकटपणाचाा स्पर्श होऊ देऊ नये आणि सभ्यतेच्या मर्यादा सांभाळल्या पाहिजेत, अशी भावना असलेले अनेक निष्ठावंत काँग्रेसजन राहुल गांधींच्या या स्टँडअप कॉमेडीमुळे नाराज झालेले पाहावयास मिळतात. त्यांची भावना पक्षापर्यंत पोहोचेल किंवा नाही, याबाबत काहीच स्पष्टता नाही. तशी काही यंत्रणा काँग्रेसकडे असेलच असे दिसत नाही.

मुळात, राहुल गांधींच्या त्या वादग्रस्त मिमिक्रीचा वाद तेवढ्यापुरता मर्यादित नाही. राजकीय अभिव्यक्तीच्या बदलत्या संस्कृतीचा प्रश्न त्यामुळे ऐरणीवर आला आहे. राजकारणात विनोदास थारा नाही असे नाही. उलट सत्तेवर विनोद करणे हे राजकीय संस्कृतीच्या आणि लोकशाहीच्या आरोग्याचे लक्षण मानले जाते. व्यंग हा तर सत्तेला दाखविला जाणारा आरसा असतो. राजकारणातील व्यंगाची परंपरा फार प्रगल्भ आणि जुनी आहे. व्यंगचित्रकार, साहित्यिक, कवी, लेखक आणि विनोदी कलावंतांनी आपल्या उच्च दर्जाच्या विनोदातून राजकीय व्यंगावर बोट ठेवणारे सुसंस्कृत विचार मांडले आहेत. त्यामुळे, नव्या जमान्यातील मिमिक्री हा प्रकार राजकारणास निषिद्ध नसला, तरी व्यंगाचे सामर्थ्य त्याच्या आशयात असते, याचा विसर पडणे योग्य नाही. केवळ एखाद्याची देहबोली, आवाज किंवा लकबीतून त्यास हिणविणे म्हणजे विनोद नाही. धोरणांवर, निर्णयांवर, सत्तेच्या कार्यपद्धतीवर किंवा सार्वजनिक भूमिकांवर विनोद वा व्यंगाच्या माध्यमातून प्रहार झाले, तर ते धारदार शस्त्राप्रमाणे प्रभावी ठरतात. मात्र, व्यक्तीची थट्टा हाच विनोदाचा गाभा असेल, तर त्यातून दिल्या जाणाऱ्या राजकीय संदेशाविषयी संदेह निर्माण होतात. गेल्या काही वर्षांत अशा प्रकारच्या थट्टेचे प्रकार वाढीस लागले असून त्यामध्ये काँग्रेसने आघाडीवर राहण्याचा आटापिटा चालविला असावा असे दिसते. सुमारे तीन वर्षांपूर्वी तत्कालीन उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांच्या देहबोलीची थट्टा करणारी मिमिक्री तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी संसद परिसरातच सादर केली, तेव्हा त्यास भरभरून दाद देणाऱ्या काँग्रेस नेत्यांना या नीतीचे अनुकरण करण्याची कल्पना सुचली असावी. एखादे वैचारिक बौद्धिक किंवा धोरणात्मक चर्चा ऐकण्यासाठी लोकांना फारसा रस नसतो, मात्र काही सेकंदांचा विनोदी व्हिडीओ वेगाने समाजमाध्यमांवर व्हायरल होतो आणि लाखो लोकांपर्यंत पोहोचतो. डिजिटल राजकारणातील या बदलामुळे विनोद, व्यंग आणि मीमसारख्या प्रकारांचा राजकारणातील प्रभाव वाढत चालला असला, तरी अशा विनोदास तरुणांकडून फारशी दाद मिळत नाही, असे गेल्या वर्षी झालेल्या एका सर्वेक्षणात स्पष्ट झाले होते. कारण आजच्या करमणुकीला किंवा मनोरंजनालादेखील माहितीचा आधार असावा लागतो, हे तरुणाईच्या मानसिकतेतून स्पष्ट झाले आहे. यामुळेच, केवळ 'एन्टरटेन्मेंट' किंवा करमणूक एवढेच आजच्या विनोदाचे अंग पुरेसे नाही. त्याला 'इन्फोटेन्मेंट' असे स्वरूप असले पाहिजे. म्हणजे, मनोरंजनास माहितीचा सज्जड आधार असावा अशी आजच्या माध्यमविश्वाकडून तरुणाईची अपेक्षा आहे. राजकारणासमोरील हे एक मोठे आव्हान असताना, काँग्रेस मात्र राहुल गांधींच्या माध्यमातून तरुणाईच्या माथी केवळ मनोरंजन मारणार असेल, तर त्याचे राजकीय परिणाम त्यांना दिसतील यात शंका नाही. ■

## प्रासंगिक

# जल समन्वयासाठी भारताचे आवाहन

**सी. आर. पाटील**

इतर काही मोजक्या संसाधनांप्रमाणेच पाणीही आपल्याला परस्परांशी जोडते. नद्यांना प्रशासकीय सीमा समजत नाहीत, जलसाठ्यामुळे अनेक समुदायांचे भरण-पोषण होते आणि आज जो पाऊस पडतो, तो उद्या आपल्यासाठी पिण्याचे पाणी, सिंचनाचे स्त्रोत, भूजल पातळी किंवा नदीचा प्रवाह यापैकी काहीतरी एक बनतो. हीच नैसर्गिक जगरहाटी आपल्याला अत्यंत साधे मात्र महत्त्वाचे तत्त्व सांगते : पाणी हे एक सामायिक संसाधन असून ते सुरक्षित ठेवणे, ही आपल्या पुढच्या पिढ्यांसाठीची आपली सामूहिक जबाबदारी आहे. याच भावनेने, भारताने नवी दिल्लीत होणाऱ्या नवव्या आंतरराष्ट्रीय जल सप्ताहासाठी जगभरातील जल समुदायाला भारतात येण्याचे निमंत्रण दिले आहे. केंद्रीय जल शक्ती मंत्रालयाने २२ ते २६ सप्टेंबर २०२६ या काळात ही परिषद आयोजित केली असून त्याची संकल्पना 'हवामान बदलात टिकून राहू शकेल, असे जल व्यवस्थापन' अशी आहे. आज जेव्हा हवामान बदलामुळे जलचक्र अनिश्चित होत चालले आहे, अशावेळी ही संकल्पना अधिकच यथोचित ठरली आहे.

भारतीय आंतरराष्ट्रीय जल सप्ताह, ही केवळ एक परिषद नाही, तर, हा एक असा मंच आहे, जिथे सरकारे, तज्ज्ञ लोक, उद्योग क्षेत्र, समुदाय आणि आंतरराष्ट्रीय भागीदार एकत्र येऊन आपले अनुभव, तंत्रज्ञान आणि कल्पना यांचे आदानप्रदान करू शकतात आणि भविष्यासाठी एक भागीदारी निर्माण करू शकतात. तसेच, पाण्याविषयी अलिकडेच झालेल्या विभागीय परिषदेत मांडली गेलेली तत्त्वे आणि शिकवण पुढे घेऊन जाण्याचाही या परिषदेचा उद्देश असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या संकल्पनेनुसार, भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी एकत्र येऊन, जल क्षेत्रातील आव्हानांवर चर्चा केली; त्यातून काय मार्ग काढता येईल, यावर चर्चा केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, जल जीवन अभियानांतर्गत, १५.९ कोटी ग्रामीण घरांपर्यंत नळाने पाणीपुरवठा सुरू केला आहे, २०१९ मध्ये हे प्रमाण केवळ ३.२३ कोटी एवढेच होते. जल जीवन मिशनच्या दुसऱ्या टप्प्यात (२.०) पाणी-पुरवठ्यासाठीच्या पायाभूत सुविधांचे रूपांतर, अवलंबून राहण्यासारख्या, सार्वजनिक सेवा वितरण प्रणालीमध्ये करण्यावर भर देण्यात आला आहे. ग्राम पंचायत, ग्रामीण पाणीपुरवठा आणि स्वच्छता समित्या यासाठी सक्षम करण्यात आल्या. 'जल सेवा आकलन' या अंतर्गत, ग्राम पंचायतीच्या नेतृत्वाखाली, डिजिटल पेयजल सेवाकार्याचे मूल्यमापन केले जाते. 'हर घर जल' गावांमध्ये पिण्याच्या पाणीपुरवठ्याची नियमितता, पुरेसेपणा, गुणवत्ता व शाश्वतता यांचे मूल्यांकन करण्यावर या उपक्रमाचा भर आहे. 'नमामि गंगे' अभियानाच्या माध्यमातून भारताने गंगा आणि तिच्या उपनद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारला आहे. यामध्ये सांडपाणी व्यवस्थापनासाठी पायाभूत सुविधा उभारणे आणि प्रदूषण कमी करण्यासोबतच पर्यावरणीयदृष्ट्या पुनरुज्जीवन, जैवविविधतेचे संवर्धन आणि लोकसहभाग या मांडणीचा समावेश आहे. या कार्यक्रमांतर्गत ५२७ हून अधिक प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. पैकी ३६७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. या माध्यमातून दररोज ४,२६३ दशलक्ष लिटर सांडपाणी प्रक्रिया करण्याची क्षमता निर्माण झाली आहे.

स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण योजनेतूनही तितकाच महत्त्वाचा धडा मिळतो. ग्रामीण भागात १२ कोटींहून अधिक शौचालये बांधण्यात आली आहेत. हिमालयीन प्रदेशातील राज्यांच्या गरजा आणि कोरड्या प्रदेशातील गरजा वेगळ्या असतात. वाढत्या शहरांसमोरील आव्हाने आणि ग्रामीण समुदायांसमोरील आव्हानेही भिन्न असतात. ही विविधताच, आपली राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना भूजल पुनर्भरण, सिंचनाची कार्यक्षमता, पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेचे सामुदायिक व्यवस्थापन आणि सांडपाण्याचा पुनर्वापर याबाबतच्या अनुभवांचा समृद्ध स्रोत बनवते. जलसुरक्षेबाबत सर्वच प्रश्नांची उत्तरे कोणत्याही एका देशाकडे नाहीत आणि प्रत्येक देशाकडे योगदान देण्यासाठी तसेच इतरांकडून शिकण्यासाठी काही ना काही अनुभव आहे. त्यामुळे भारतीय आंतरराष्ट्रीय जल सप्ताह हा कोणावर उपाय लादण्याऐवजी भागीदारीच्या भावनेचे प्रतीक आहे.

जलसुरक्षा, अन्नसुरक्षा, सार्वजनिक आरोग्य, उपजीविका, पर्यावरणीय सुरक्षा आणि शाश्वत विकासाशी अविभाज्यपणे जोडलेली आहे. त्यामुळे भारतीय आंतरराष्ट्रीय जल सप्ताहात, नदीखोरे आणि जलसाठ्याचे व्यवस्थापन, सांडपाण्याचा पुनर्वापर, पाण्याचा कार्यक्षम वापर, हवामानाचा अंदाज वर्तविण्याची यंत्रणा, पूर्वसूचना प्रणाली आणि पर्यावरणीय प्रवाह यांसारख्या विविध विषयांवर चर्चा केली जाते. या सगळ्या परिवर्तनात, तंत्रज्ञान अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडणार आहे. तंत्रज्ञानाचा खरा उपयोग तेव्हाच होतो, जेव्हा सरकार, स्थानिक संस्था आणि समुदाय त्यामुळे, अधिक चांगले निर्णय घेण्यास सक्षम होतात. त्यामुळे या प्रक्रियेत क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणारे तज्ज्ञ, स्टार्ट-अप्स आणि युवकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. जल जीवन मिशनच्या संस्थात्मक सुधारणांच्या अंतर्गत 'सुजलाम भारत' ही डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा व्यवस्था, माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर करून नियोजन, जलस्त्रोतांची शाश्वतता, कामगिरीचे निरीक्षण आणि नागरिककेंद्रित प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी कार्यरत आहे.

आव्हानांची व्याप्ती जेवढी मोठी, तेवढा वित्तपुरवठा देखील असणे आवश्यक आहे. सार्वजनिक गुंतवणूक तर मूलभूत गोष्ट असेलच; मात्र, हवामान-बदलाशी सुसंगत अशा पायाभूत सुविधांची उभारणी, करण्यासाठी वित्तपुरवठ्याचे काही अभिनव मार्ग शोधावे लागतील, जबाबदार असा खाजगी सहभाग आणि भागीदारी, जी सार्वजनिक उद्दिष्ट मध्यवर्ती स्थानी ठेवून, स्त्रोत एकत्रित आणू शकेल, त्याची गरज आहे. त्याचवेळी, निर्मळ स्वच्छ नद्या, पाणथळ प्रदेश, जलसाठे आणि परिसंस्था हे देखील आपल्या जल विषयक पायाभूत सुविधांचाच एक भाग आहेत. हवामान बदलामुळे पर्जन्यमानातील अनिश्चितता वाढत असताना, अतिवृष्टी, दीर्घकाळ टिकणारा कोरडा कालावधी, पूरस्थिती आणि भूजलावरील वाढता ताण यांसारख्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी जलस्रोतांची शाश्वतता, अधिक सक्षम विज्ञान आणि हवामानाचा अंदाज, परिस्थितीनुसार बदल करता येणाऱ्या पायाभूत सुविधा, सक्षम संस्थात्मक व्यवस्था आणि जाणकार समुदाय आवश्यक आहेत. २२ ते २६ सप्टेंबरदरम्यान भारत मंडपम हे भारताच्या जलक्षेत्रातील अनुभव आणि जगभरातील जलविषयक ज्ञानाचे केंद्र बनेल. मोठ्या प्रमाणावर विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करताना आम्ही जे शिकलो आहोत, ते अनुभव सामाईक करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत; तसेच इतरांचे अनुभव ऐकून त्यातून शिकण्यासही आम्ही उत्सुक आहोत. पुढील पिढ्यांसाठी पाण्याचा प्रत्येक थेंब सुरक्षित ठेवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केले पाहिजे आणि पंतप्रधानांनी दिलेल्या 'विकसित भारत@२०४७'च्या संकल्पपूर्तीसाठी आपले योगदान सुनिश्चित केले पाहिजे. ■

(लेखक केंद्रीय जल शक्ती मंत्री आहेत)

## वेध

**नितीन शिरसाट**

# शक्तिपीठ महामार्गाला विरोध कशासाठी ?

शक्तिपीठ महामार्ग नागपूर-गोवा द्रुतगती मार्ग हा महाराष्ट्र शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी राज्यातील सर्वात लांब प्रस्तावित हा महामार्ग विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या प्रदेशांना थेट गोव्याशी जोडणार आहे. रोजगार निर्मिती, दळणवळण सुविधा, औद्योगिक क्षेत्रांना जोडून शेतकऱ्यांची आर्थिक शक्ती वाढविणारा हा महामार्ग असल्याने मागास भागांच्या विकासाला गती मिळेल. कृषी समृद्धी केंद्रे, औद्योगिक पट्टे विकसित केले जातील, ज्यामुळे स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. कृषी उत्पादनांची जलद वाहतूक होऊन महामार्गाने थेट गोव्याच्या बंदरांना जोडणार असल्याने कोकणातील प्रसिद्ध हापूस आंबा, काजू तसेच पश्चिम महाराष्ट्र मराठवाड्यातील शेतीमाल बाजारात पोहोचविणे शक्य होईल. या महामार्गासाठी महाराष्ट्र शासनाने भूसंपादनासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून ग्रामीण भागात बाजारमूल्याच्या चार पट आणि शहरी भागात दोन पट मोबदला दिला जाणार आहे. तथापि, यात सुपीक शेती जमीन जाणार असल्याने मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकणातील शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध होत आहे. पर्यावरण क्षेत्रातील संवेदनशील गावांबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादन भरपाईसाठी शासनाने मार्गदर्शक नियमावली नुकतीच जाहीर केली आहे. त्यात बाधित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देताना भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना कायदा आणि महाराष्ट्र महामार्ग



अधिनियममधील लागू तरतुदींचा आधार घेतला जाणार आहे. २०१३ च्या कायद्यानुसार ग्रामीण भागातील भरपाई बाजारमूल्याच्या भावाप्रमाणे मिळणार असल्याचे सध्या तरी स्पष्ट झाले आहे. शासनाच्या दृष्टिकोनातून शक्तिपीठ महामार्ग हा मोठ्या पायाभूत सुविधांच्या आराखड्याचा भाग आहे. सरकारचा युक्तिवाद असा आहे की, या मार्गामुळे राज्याच्या वाहतूक जाळ्याला बळ मिळेल, विविध प्रदेशांतील संपर्क वाढेल, गुंतवणुकीला चालना मिळेल आणि आर्थिक विकासाला वेग येईल. आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर टप्प्याटप्प्याने काम सुरू करण्याची भूमिका सरकारने मांडली. भूसंपादन, पर्यावरण व वनविषयक मंजुरी, वैधानिक परवानग्या निविदा प्रक्रिया समांतरपणे सुरू असल्याचेही सांगण्यात आले.

शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन संपादन करताना प्रथम संबंधित जमिनीचे बाजारमूल्य निश्चित केले जाणार आहे. प्रकल्पाचे काम सुरू करण्यासाठी संबंधित जमिनीत प्रवेश करण्याची तरतूदही नियमांमध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन जाणाऱ्या शेतकऱ्यांना प्रत्यक्षात किती मोबदला मिळणार, याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे. शेतकऱ्यांची मागणी आहे की, बागायती जमिनीऐवजी पडीक किंवा कमी सुपीक जमिनीचा वापर केला जावा. योग्य भरपाई जमिनीचा मोबदला चालू बाजारभावापेक्षा जास्त पटीने एकरकमी मिळावा; जेणेकरून शेतकरी पर्यायी जमीन किंवा उपजीविकेचे साधन शोधून ज्या शेतकऱ्यांची संपूर्ण जमीन-घर जात आहे, त्यांच्या कुटुंबातील किमान एका सदस्याला शासकीय नोकरी कायमस्वरूपी रोजगाराची हमी मिळावी. शेतकरी हितासाठी काय उपाययोजना करता येतील यासाठी संबंधित शेतकऱ्यांशी थेट संवाद प्रशासनाने साधला पाहिजे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाप्रमाणे याही प्रकल्पात शेतकऱ्यांना जमिनीचा चांगला परतावा आणि भागीदारी दिली पाहिजे. भुयारी मार्ग, सर्व्हिस रोडची सुविधा निर्माण करून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी तसेच शेतीमाल वाहून नेण्यासाठी पुरेशा प्रमाणात रस्ते दिले पाहिजेत; जेणेकरून महामार्गामुळे शेतीचे दोन तुकडे होणार नाहीत. विकास हा राज्यासाठी गरजेचा आहेच, परंतु तो करताना अन्नदात्यांचे नुकसान होणार नाही; त्यांना त्यांच्या हक्काचा योग्य मोबदला मिळेल हाच खऱ्या अर्थाने शेतकरी हिताचा विचार ठरेल. ■

९८८१७१७८२८

## आंतरराष्ट्रीय

# भारताच्या ऊर्जासुरक्षेची कसोटी

**प्रा. जयसिंग यादव**

अमेरिकेने रशियावर आर्थिक दबाव वाढविण्याच्या उद्देशाने 'लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अ‍ॅण्ड इराण अ‍ॅक्ट ऑफ २०२६' हा कायदा केला आहे. रशियाच्या ऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रांवर निर्बंध अधिक कडक करण्याबरोबरच रशियन तेल आणि नैसर्गिक वायूची मोठ्या प्रमाणावर खरेदी करणाऱ्या देशांवर अतिरिक्त शुल्क लावण्याचे अधिकार या कायद्यामध्ये आहेत. या निर्णयाचे सर्वाधिक थेट परिणाम भारत आणि चीनसारख्या देशांवर होऊ शकतात. भारत सध्या रशियन कच्च्या तेलाचा जगातील प्रमुख आयातदार आहे. त्यामुळे अमेरिकेने शुल्काचा पर्याय प्रत्यक्षात वापरल्यास भारताच्या व्यापारावर आणि विशेषतः अमेरिकेला निर्यात करणाऱ्या उद्योगांवर परिणाम होण्याची शक्यता आहे; मात्र सध्याच्या स्थितीत 'भारतावर शंभर टक्के शुल्क लागू झाले' असे म्हणणे अचूक ठरणार नाही. कायदा असे शुल्क लावण्याचा अधिकार देतो. प्रत्यक्ष निर्णय अमेरिकी प्रशासनाकडून होणे बाकी आहे. याच ठिकाणी भारताची भूमिका महत्त्वाची ठरते. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे, की देशाच्या १.४ अब्ज लोकांची ऊर्जा सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. बदलत्या बाजारपेठेच्या परिस्थितीनुसार आणि विविध स्त्रोतांमधून ऊर्जा मिळवण्याच्या धोरणानुसार भारत आपली ऊर्जा गरज भागवत राहील, अशी भूमिका सरकारने मांडली आहे.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेचा मोठा हिस्सा आयात करतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढल्या, पुरवठा विस्कळीत झाला किंवा एखाद्या एका देशाकडून तेल घेण्यावर निर्बंध आले, तर त्याचा परिणाम थेट भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. पेट्रोल-डिझेलच्या किमतीपासून वाहतूक खर्चापर्यंत आणि उत्पादन खर्चापासून महागाईपर्यंत अनेक घटकांवर त्याचे पडसाद उमटतात. भारताने मध्यपूर्व, आफ्रिका, लॅटिन अमेरिका, युरेशिया आणि अमेरिकेसह विविध भागीदारांकडून ऊर्जा खरेदी करण्याचे धोरण कायम ठेवले आहे. म्हणूनच अमेरिकी दबावाला भारताने भावनिक प्रतिक्रिया देण्यापेक्षा आर्थिक आणि सामरिक गणितातून उत्तर देणे आवश्यक आहे. ऊर्जा पुरवठ्यासाठी कोणत्याही एका देशावर अवलंबून राहणे धोकादायक आहे; परंतु केवळ दबावाखाली स्वस्त आणि उपलब्ध ऊर्जा स्त्रोत सोडणेही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सहज पचणारे ठरणार नाही. अमेरिकेच्या नव्या कायद्यामागील उद्देशही समजून घ्यावा लागेल. मात्र रशियावर दबाव आणताना भारतासारख्या मोठ्या अर्थव्यवस्थेवर शुल्काचा दबाव आणण्याचे व्यापक परिणामही होऊ शकतात. भारत हा केवळ रशियाकडून तेल घेणारा देश नाही. तो अमेरिकेसाठी मोठी बाजारपेठ आणि महत्त्वाचा व्यापार भागीदारही आहे. त्यामुळे ऊर्जा व्यापार आणि द्विपक्षीय व्यापार याकडे एकाच चौकटीत पाहिल्यास प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होतो. अमेरिकेतील काही विश्लेषकांनीही अशा शुल्काच्या संभाव्य परिणामांबाबत चिंता व्यक्त केली आहे. गेल्या काही दशकांमध्ये संरक्षण, तंत्रज्ञान, व्यापार, इंडो-पॅसिफिक आणि चीनसंबंधी धोरण अशा अनेक क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये सहकार्य वाढले आहे. त्यामुळे एका मुद्यावर निर्माण झालेला तणाव संपूर्ण संबंधांवर परिणाम करणार नाही, यासाठी दोन्ही बाजूंना मुत्सद्देगिरीची गरज आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार एच. आर. मॅकमास्टर यांनीही भारत-अमेरिका संबंधांच्या दीर्घकालीन महत्त्वावर भर देत, भारताने रशियाविरोधात भूमिका घेण्यासाठी किंवा ब्रिक्ससारख्या समूहांपासून दूर जाण्यासाठी दबाव आणणे टाळावे, असे मत व्यक्त केले आहे. भारतासाठी खरी अडचण 'अमेरिका की रशिया' अशी निवड करण्याची नाही. भारताच्या परराष्ट्र धोरणासमोर आज अनेक केंद्रांशी एकाच वेळी संबंध ठेवण्याचे आव्हान आहे. रशियाशी संरक्षण आणि ऊर्जा संबंध आहेत. अमेरिकेशी तंत्रज्ञान, व्यापार आणि संरक्षण सहकार्य आहे. मध्यपूर्व भारतासाठी ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे, तर चीन हा मोठा व्यापारी आणि सामरिक घटक आहे. त्यामुळे कोणत्याही एका समीकरणाला सर्व काही समर्पित करणे भारताच्या हिताचे ठरणार नाही. या पृष्ठभूमीवर ऊर्जा स्त्रोतांचे विविधीकरण हा दीर्घकालीन उपाय आहे. भारताने मध्यपूर्वेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी रशियन तेलाचा वापर वाढवला. आता रशियावरील संभाव्य अमेरिकी दबावामुळे पुन्हा स्त्रोतांचे संतुलन साधावे लागेल. अमेरिकेकडून ऊर्जा आयात वाढवणे, मध्यपूर्वेतील पुरवठा सुरक्षित ठेवणे, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील पर्याय शोधणे आणि देशांतर्गत अक्षय ऊर्जा क्षमता वाढवणे या उपायांचा एकत्रित विचार आवश्यक आहे. यासोबतच देशाच्या तेल शुद्धीकरण क्षमतेचा आणि धोरणात्मक पेट्रोलियम साठ्याचा विस्तारही महत्त्वाचा ठरतो. कारण जागतिक बाजारात कोणत्याही कारणाने पुरवठा कमी झाला, तर कच्च्या तेलाची किंमत वाढते आणि त्याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो.

एखाद्या राष्ट्राचे ऊर्जा सुरक्षा धोरण केवळ तेल कुठून खरेदी करायचे एवढ्यापुरते मर्यादित नसते, तर संकटाच्या काळात किती काळ पुरवठा सुरक्षित ठेवता येतो, याचाही प्रश्न आहे. नव्या कायद्याने अमेरिकी अध्यक्षांना मोठे अधिकार दिले असले, तरी त्यांचा प्रत्यक्ष वापर कोणत्या देशावर, किती प्रमाणात आणि कोणत्या अटींवर केला जाईल, हे पुढील निर्णयांवर अवलंबून आहे. त्यामुळे तातडीने निष्कर्ष काढण्यापेक्षा घटनाक्रमावर बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. भारताने या परिस्थितीत दोन गोष्टी स्पष्टपणे साध्य करायला हव्यात. पहिली म्हणजे देशातील ग्राहक आणि उद्योगांना परवडणारी ऊर्जा उपलब्ध राहणे. दुसरी म्हणजे कोणत्याही बाह्य दबावामुळे भारताच्या व्यापक व्यापार आणि परराष्ट्र धोरणाच्या पर्यायांवर अनावश्यक मर्यादा येऊ नयेत. या दोन्ही उद्दिष्टांचा समतोल साधणे सोपे नाही; पण हाच मुत्सद्देगिरीचा कस आहे. रशियन तेलाचा मुद्दा हा आता केवळ भारत-रशिया किंवा भारत-अमेरिका संबंधांचा विषय राहिलेला नाही. तो जागतिक ऊर्जाबाजार, युद्धाचे अर्थशास्त्र, निर्बंधांचे राजकारण आणि बदलत्या बहुध्रुवीय जगाचा भाग बनला आहे. अमेरिकेने रशियावर आर्थिक दबाव वाढवण्याचा मार्ग निवडला आहे. भारताला मात्र आपल्या ऊर्जा गरजा आणि राष्ट्रीय हित लक्षात घेऊन पुढची पावले उचलावी लागतील. भारताने या संकटाकडे एका देशाविरुद्ध दुसऱ्या देशाची निवड म्हणून पाहण्याऐवजी ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने आणखी एक इशारा म्हणून पाहिले पाहिजे. स्वस्त तेल मिळत असताना त्याचा लाभ घेणे आवश्यक होते; परंतु त्याच वेळी पर्यायी ऊर्जा स्त्रोत, अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहतूक, ऊर्जा कार्यक्षमता आणि धोरणात्मक साठे यांना वेग देणेही तितकेच आवश्यक आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वाचक पत्रे

### आध्यात्मिक रूपक आणि त्यातील बोध

बुद्धी शुद्ध अर्थात आत्मज्ञान प्राप्त करणे शुभ विचारांना अडवू शकत नाही, बुद्धी स्वतःच्या अहंकारातून पहारेकऱ्याचे मूर्त रूप निर्माण करते. अहंकार चांगल्या विचारांना अडवतो आणि शुभ विचार अहंकाराचा नाश करतात. अशावेळी दूरदृष्टी, तीक्ष्ण नजर, वाईटाचा त्याग व चांगल्याचा स्वीकार करणारे हे सर्व फक्त गजमुखात असल्यामुळेच आणि बुद्धिमान माणसातच हे सर्व गुण असल्यामुळे श्री गणेशच बुद्धीची देवता ठरते, हे समजण्यासाठीची गणेशाला हत्तीचे शीर का? या आध्यात्मिक रूपकाची बोधकथा कथापुराणांमधून प्रबोधित झालेली आहे. श्री गणेश हे बुद्धी, विवेक, मूलाधार चक्र, ध्वनी व वैश्विक चेतनेचे अधिष्ठान आहेत. परा, पश्यन्ति, मध्यमा व वैखरी या चारही अवस्थांचे नियमन श्री गणेश करतात. मानवीय जाणीव ईश्वरी सत्ता यांचा दुवा म्हणजेच श्री गणेश आहेत. विवेकाला बाह्य सौंदर्याच्या दर्पाचा उपहास सहन होत नाही हे सांगण्यासाठी गणेशांनी चंद्राला शाप दिला हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. चंचल मनाने विवेकावर केलेले हास्य आणि त्याचे परिणाम याचाही विचार करणे गरजेचे आहे. संशय आणि चंचल तर्क हा मूषकच्या रूपाने प्रकट आहे. शुद्ध स्वरूपातील क्लोरोफिल म्हणजेच दूर्वा ज्या मज्जासंस्था व हिमोग्लोबीन वाढविण्याला मदत करतात. या सर्वांचा मनापासून अभ्यास केला तरच श्री गणेश म्हणजे कोण हे समजेल.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे अवमानाची मोकळीक नव्हे !

भारतीय राज्यघटनेने देशातील नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य अधिकार दिलेले आहेत. या अधिकाराच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकाला आपले मत, विचार, भावना व्यक्त करण्याचा अधिकार आहे. अन्याय-अत्याचाराविरुद्ध संविधानाच्या अधीन राहून न्याय मागण्याचाही अधिकार आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ इतरांचा अवमान करणे, इतरांच्या वैयक्तिक जीवनात ढवळाढवळ करणे, त्यांचे चारित्र्य हनन करणे, त्यांच्या वागण्याची टिंगल-टवाळकी करणे, त्यांच्यावर व्यंगात्मक बोलणे असे नाही, तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे संविधानिक मूल्ये, मानवी मूल्ये, नैतिक मूल्ये, सामाजिक मूल्ये यांचे भान राखत सदरील व्यक्ती किंवा लोकप्रतिनिधींविषयी मान-सन्मान राखत आपले मत व्यक्त करणे होय. मात्र, आज या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पदोपदी उल्लंघन होत आहे. कोणाचीही मानमर्यादा न राखता तसेच त्या व्यक्तीच्या घटनात्मक दर्जाचा मान न राखता, उच्चपदस्थ अधिकारी यांचाही मान न राखता त्यांचा अपमान कसा होईल ?अभिव्यक्ती स्वातंत्र्य काय आहे हे आधी समजून घेणे व मगच बोलणे योग्य वाटते. अन्याय-अत्याचार दूर करण्यासाठी कायदेशीर मार्ग असताना या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरशब्दांनी वापर हा घटनात्मक गुन्हा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### आपत्काळासाठी आध्यात्मिक सिद्धता महत्त्वाची

इंडोनेशियामध्ये झालेला 'अनाक क्राकाटोआ' ज्वालामुखीचा भीषण उद्रेक हा पृथ्वीच्या पोटातील खदखद किती प्रलयकारी असू शकते, याची जाणीव करून देणारा आहे. या उद्रेकात जीवितहानी झाली नसली, तरी त्याचे अत्यंत भीषण आणि थरारक परिणाम झाले आहेत. या उद्रेकाचा आवाज इतका प्रचंड होता की, तो शेकडो किलोमीटर दूरपर्यंत ऐकू गेला.माणसाच्या चुकीच्या कृतींमुळे आणि वाईट विचारांमुळे वातावरणात 'रज-तम' म्हणजेच अशुद्धता वाढते; त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडतो. आज पर्यावरणाचा ऱ्हास, जलप्रदूषण, वायूप्रदूषण, जंगलतोड आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अनिर्बंध वापर यांमुळे पृथ्वीसमोरील संकटे वाढत आहेत. त्यासाठी सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे, गोपालन करणे, पाणी, वीज आणि अन्न वाया न घालवणे, वृक्षांचे संवर्धन करणे, प्रदूषण टाळणे आदी कृतींद्वारे निसर्गाच्या संवर्धनासाठी योगदान देऊ शकतो. पाणी, वीज आणि अन्न वाया न घालवणे हीदेखील एक प्रकारची निसर्गसेवा किंवा साधनाच आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या कृतींमधूनही निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करता येते. निसर्गाच्या सूक्ष्म स्तरावरील शुद्धीसाठी भारतीय संस्कृतीत विविध आध्यात्मिक उपाय सांगितले आहेत. सनातन संस्थेच्या वतीनेही 'अग्निहोत्रा'सारख्या आध्यात्मिक उपायांविषयी प्रबोधन केले जाते. संकटे येण्याची वाट पाहण्यापेक्षा त्यांना सामोरे जाण्यासाठी मानसिक, शारीरिक, सामाजिक आणि आध्यात्मिक स्तरांवर सिद्ध असणे आवश्यक आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी निसर्गाच्या महाशक्तीपुढे आपले उपाय तोकडे पडतात. त्यामुळे पर्यावरण रक्षणाबाबत अधिक सजग राहणे ही काळाची खरी गरज आहे. भविष्यातील संकटांना सामोरे जाण्यासाठी बाह्य सिद्धतेसोबतच अंतर्मनाची सिद्धताही आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत काय काळजी घ्यावी, कोणती पूर्वसिद्धता करावी आणि संकटाच्या काळात स्वतःचे, कुटुंबाचे आणि समाजाचे संरक्षण कसे करावे, याविषयी मार्गदर्शन करणारे सनातन संस्थेचे 'आपत्काळाची सिद्धता' हे पुस्तक महत्त्वपूर्ण ठरते. ■

**वर्षा आवदे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87


stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माजी उपनगराध्यक्ष मोईजभाई शेख यांचे निधन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ सप्टेंबर : शिवछत्रपती पुरस्काराने गौरविण्यात आलेले, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा लातूरचे माजी उपनगराध्यक्ष मोईजभाई शेख यांचे मंगळवारी दि. २२ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने लातूरच्या सामाजिक, राजकीय आणि विशेषतः क्रीडा क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

मोईजभाई शेख यांनी आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले. उत्तम खेळाडू म्हणून त्यांनी क्रीडा क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. विशेषतः हॉलीबॉलच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले. जिल्ह्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देणे, विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे तसेच खेळाडूंना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले.

लातूर जिल्हा हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी संघटनात्मक पातळीवर महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या कार्यकाळात अनेक खेळाडूंना व्यासपीठ मिळाले आणि क्रीडा क्षेत्राला चालना मिळाली. त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाची दखल घेत त्यांना शिवछत्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच सामाजिक, राजकीय आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून शोक व्यक्त करण्यात आला.



## विविध वृत्त.....

### महाराष्ट्र राज्य बाजार समितीच्या प्रभारी सभापतीपदी संतोष सोमवंशी



तभा वृत्तसेवा

औसा दि २२ सप्टेंबर : महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ पुणे चे सभापती बाळासाहेब नाहटा यांच्या विरोधातील अविश्र्वास ठराव सर्वानुमते मंजूर झाल्यानंतर सभापतीपद रिक्त झाले. या रिक्त झालेल्या पदाचा प्रभारी सभापती म्हणून संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला आहे.

पुणे येथे झालेल्या संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अविश्र्वास ठरावावर चर्चा झाली. या बैठकीत सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. त्यानंतर सभापतीपदाची जबाबदारी उपसभापती संतोष सोमवंशी यांच्याकडे सोपविण्यात आली.

पदभार स्विकारल्यानंतर सोमवंशी यांनी बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकरी, व्यापारी व संबंधित घटकांच्या हितासाठी संघाचे कामकाज अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. राज्यातील बाजार समित्यांच्या विविध प्रश्नांवर समन्वय साधून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यास प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

संतोष सोमवंशी यांची प्रभारी सभापतीपदी नियुक्ती झाल्याबद्दल बाजार समिती क्षेत्रातील पदाधिकारी, संचालक व सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# लातुरात ऑटोचालक रमाकांत कसबे यांचा प्रामाणिकपणा रिक्षात विसरलेली मौल्यवान साहित्याची बॅग मूळ मालकास सोपविली



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ सप्टेंबर : लातूर शहरातील ऑटोचालक रमाकांत कसबे यांनी आपल्या ऑटोरिक्षात विसरलेली एका प्रवाशाची बॅग आतील मौल्यवान साहित्यांसह मूळ मालकास सुपूर्द करून प्रामाणिकपणाचे एक आदर्श उदाहरण समाजासमोर प्रस्तुत केले. या प्रामाणिकपणाबद्दल विवेकानंद पोलीस ठाण्याच्या वतीने कसबे यांच्यासंमं करण्यात आला.

प्रवाशाची घाईगडबडीत ऑटोमध्ये विसरलेली लॅपटॉप, महत्त्वाची कागदपत्रे, ओळखपत्रे व इतर मौल्यवान साहित्य असलेली बॅग ऑटोचालकाने प्रामाणिकपणे पोलिसांच्या स्वाधीन केली. विवेकानंद चौक पोलिसांनी तत्परता दाखवत बॅगमधील कागदपत्रांच्या आधारे मूळ मालकाचा शोध घेऊन सुमारे एक लाख रुपये किमतीचा लॅपटॉप व इतर साहित्य सुरक्षितपणे परत केले. ऑटोचालकाच्या या प्रामाणिकपणाचे कौतुक करत पोलिसांनी त्यांचा सन्मान केला.ऑटोचालक रमाकांत अभंग कसबे, रा. राजीव नगर, लातूर यांच्या ऑटोमधून तय्यब चांदपाशा शेख, रा. पानचिंचोली हे लातूर येथे आले होते. लातूर येथे उतरताना घाईगडबडीत शेख यांची लॅपटॉप, महत्त्वाची कागदपत्रे, ओळखपत्रे व इतर साहित्य असलेली बॅग ऑटोमध्येच राहिली. प्रवासी निघून गेल्यानंतर काही वेळाने ऑटोचालक रमाकांत कसबे यांच्या निदर्शनास ही बॅग आली.बॅगेतील साहित्याची पाहणी केल्यानंतर ती कोणीतरी प्रवासी विसरल्याचे लक्षात येताच कसबे यांनी कोणताही स्वार्थ न ठेवता सदर बॅग विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात आणून जमा केली. पोलिसांनी बॅगेतील कागदपत्रांच्या आधारे तिच्या मूळ मालकाचा शोध घेतला. त्यानंतर तय्यब चांदपाशा शेख यांच्याशी संपर्क साधून त्यांना पोलीस ठाण्यात बोलावून घेण्यात आले.

ओळख व मालकीची खात्री केल्यानंतर पोलिसांनी सुमारे एक लाख रुपये किमतीचा लॅपटॉप, महत्त्वाची कागदपत्रे, ओळखपत्रे व इतर साहित्य असलेली बॅग तय्यब शेख यांच्या स्वाधीन केली. मौल्यवान वस्तू परत मिळाल्याने शेख यांनी विवेकानंद चौक पोलिसांचे तसेच ऑटोचालक रमाकांत कसबे यांचे आभार मानले. दरम्यान, ऑटोचालक रमाकांत कसबे यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणा व सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ व हार देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी पोलीस उपनिरीक्षक चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक आंधळे, पोलीस अंमलदार धैर्यशील मुळे यांच्यासह पोलीस अधिकारी-अंमलदार व नागरिक उपस्थित होते. प्रवाशाच्या मौल्यवान वस्तू स्वतःकडे न ठेवता त्या पोलिसांच्या स्वाधीन करून प्रामाणिकपणाचा आदर्श निर्माण करणाऱ्या रमाकांत कसबे यांच्या कृतीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### दिवाळी २०२६ निमित्त तात्पुरत्या फटाका विक्री परवान्यासाठी २८ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ सप्टेंबर : दिवाळी २०२६ सणानिमित्त जिल्ह्यात तात्पुरत्या स्वरूपात फटाका विक्री दुकाने सुरू करण्यासाठी परवान्याकरिता २८ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

'एक्सप्लोसिव्ह रूल्स २००८' मधील नियम ८४ नुसार सुरक्षा अटींच्या अधीन राहून तात्पुरता परवाना देण्याचे अधिकार जिल्हादंडाधिकारी यांना असून यानुसार अर्जांची छाननी, स्थळ पाहणी आणि विविध परवानग्यांची कार्यवाही पूर्ण केली जाणार आहे. अर्जदारांनी २८ सप्टेंबर २०२६ पर्यंत सेतू सुविधामधून प्राप्त विहित नमुन्यातील अर्ज, आधार कार्ड अथवा विजेचे बिल यांसारखा रहिवास पुरावा, स्थानिक स्वराज्य संस्थेचा नाहरकत दाखला, जागेच्या मालकीचा पुरावा किंवा भाडेपट्टा, तसेच जागा भाडेतत्त्वावर असल्यास जागामालकाचे संमतीपत्र, प्रस्तावित दुकानाच्या जागेचा नकाशा व लेआउट प्लॅन या आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावयाचे आहेत.

त्यानंतर १८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत तहसीलदार व पोलीस विभागाकडून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अहवाल सादर केला जाईल. या पाहणीदरम्यान प्रस्तावित जागा सुरक्षित असणे, शेड ज्वलनशील नसलेल्या साहित्याचे असणे, दोन शेडमध्ये किमान ३ मीटरचे तर सुरक्षित कामापासून ५० मीटरचे अंतर असणे, क्लस्टरमध्ये ५० पेक्षा अधिक दुकाने नसणे, शाळा, रुग्णालये, धार्मिक स्थळे, पेट्रोल पंप व दाट लोकवस्तीच्या ठिकाणांपासून सुरक्षित अंतर असणे, तसेच अग्निशमन व आपत्कालीन मार्ग उपलब्ध असणे या सर्व सुरक्षा निकषांची पडताळणी केली जाणार आहे.

१९ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कार्यालयीन छाननी व विहित परवाना शुल्क भरण्याची प्रक्रिया पार पडेल आणि पात्र ठरलेल्या अर्जदारांना २३ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ दरम्यान अंतिम तात्पुरता फटाका विक्री परवाना निर्गमित केला जाईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## रक्तदानासोबत रस्ता सुरक्षेचा संदेश; चाकूरमध्ये १०४ रक्तदात्यांना हेल्मेट भेट देऊन सन्मान, मोरया व्यापारी गणेश मंडळाचा स्तुत्य उपक्रम



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २२ सप्टेंबर : शहरातील बोथी रोड, येथील मोरया व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल १०४ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. विशेष म्हणजे मोरया व्यापारी गणेश मंडळाच्या वतीने रक्तदात्यांना प्रमाणपत्रासोबतच हेल्मेट भेट देऊन त्यांचा अनोखा सन्मान करण्यात आला आणि रस्ता सुरक्षेचा संदेश देण्यात आला.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सूरज बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष डॉ. चंद्रप्रकाश नागीमे हे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक बालाजी भंडे, पोलीस उपनिरीक्षक किरण रायझुबे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, अनिल वाडकर, जिल्हा उपाध्यक्ष संतोष फुलारी, डॉ. एन. जी. मिर्झा, डॉ. सतीश कदम, डॉ. लक्ष्मण कोरे, डॉ. कृष्णकुमार काप्रतवार, माजी उप नगराध्यक्ष अरविंद बिरादार, विनोद नीला, संदीप शेटे, बिलाल पठाण, पपन कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

व्यापारी गणेश मंडळाने यावर्षी केवळ रक्तदानच नव्हे तर रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करण्याचा स्तुत्य उपक्रम राबवला. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक दात्याला हेल्मेट भेट देण्यात आले. रक्तदान करून तुम्ही एका व्यक्तीचा जीव वाचवता, आणि हेल्मेट घालून तुम्ही स्वतःचा जीव वाचवा, असा संदेश यावेळी देण्यात आला.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मोरगे, उपाध्यक्ष नरसिंग जाधव, सचिव शिवम कोरे, कोषाध्यक्ष विश्र्वप्रताप सूर्यवंशी, गणेश माकने, सजावट प्रमुख परमेश्र्वर आवाळे, मिरवणूक प्रमुख राम काळे, नागेश पाटील, नितीन हाके, अनिल मोठे, ओम अक्कानवरु, मंगेश घुमे, मनोज चिटबोने, दयानंद पाटील, शैलेश रोडगे, सचिन पाटील, नारायण गोलावार, गोविंद जाधव, गोटू सोमवंशी, विजय कोरे, विठ्ठल जाधव, ओम बिरनाळे, रंगनाथ चिद्रेवार, सुधाकर घुगे आणि चंद्रकांत वट्टमवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ सप्टेंबर : महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठीच्या ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांचे हस्ते करण्यात आला आहे. शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिला शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या या योगदानाला अधिकृत ओळख मिळावी आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांना अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या माध्यमातून राज्यातील पात्र महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख मिळणार असून, कृषी योजना, कृषी कर्ज, विमा, कृषी निविष्ठा, विस्तार सेवा तसेच विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ अधिक सुलभतेने मिळण्यास मदत होणार आहे.

विशेष म्हणजे, महिला शेतकरी म्हणून मान्यता देताना केवळ जमिनीची मालकी हा निकष न ठेवता शेतीतील प्रत्यक्ष सहभागाला महत्त्व देण्यात आले आहे. पिकांची लागवड, बीजोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, मधुमक्षिकापालन, फलोत्पादन, पुष्पोत्पादन यांसह विविध शेती व शेतीपूरक कामांमध्ये सहभागी महिलांचा यामध्ये समावेश आहे.

तसेच भाडेपट्ट्याने किंवा बटाईने शेती करणाऱ्या महिला, भूमिहीन शेतकरी, भूमिहीन पशुपालक, शेतमजूर, रोपमळा मजूर आणि पशुचारक यांनाही या उपक्रमाचा लाभ मिळणार आहे. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून पात्र महिला शेतकऱ्यांची ओळख पटवून त्यांना प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यास प्रोत्साहित करण्यात येणार आहे. २ ऑक्टोबर २०२६ च्या ग्रामसभेत या महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटपाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

## 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून १९ हजार नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्र्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे हजारो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला आहे. अनंत चतुर्थीपर्यंत हे अभियान सुरु राहणार आहे.

लातूर जिल्ह्यात १५ सप्टेंबर ते २० सप्टेंबर दरम्यान ३२२ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून १९ हजार ३४७ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. मोफत आरोग्य तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांमध्ये ८ हजार ३६७ पुरुष, ९ हजार १५१ महिला आणि १ हजार ८२९ बालकांचा समावेश आहे.

या अभियानात लातूर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण, निमशहरी, शहरी अशा सर्व स्तरावरील सार्वजनिक आरोग्य संस्था, धर्मादाय नोंदणीकृत अंतर्गत आरोग्य संस्था, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना संलग्नित रुग्णालय, मुख्यमंत्री सहायता निधी योजना संलग्नित रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय यांचा समावेश आहे. हे अभियान २५ सप्टेंबर पर्यंत सुरु राहणार असून नागरिक, भाविक भक्तांनी या शिबिरात आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी, लातूर येथील मुख्यमंत्री सहायता कक्षामार्फत करण्यात आले आहे.

## संघर्ष, कष्ट आणि संस्कारांतून जीवन घडते : डॉ. लहाने



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २२ सप्टेंबर : जीवनात यश संपादन करण्यासाठी अभ्यासासोबतच कष्ट, जिद्द आणि प्रतिकूल परिस्थितीशी सामना करण्याची तयारी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अडचणींना घाबरून न जाता त्यांच्यावर मात करून शिक्षण घ्यावे, असा प्रेरणादायी संदेश सुप्रसिद्ध सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी दिला.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील श्री विरूपाक्षेश्र्वर नवतरुण गणेश मंडळाच्या वतीने रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी श्री विरूपाक्षेश्र्वर मठ येथे 'असा मी घडलो' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. लहाने यांनी आपल्या जीवनातील अनुभव आणि संघर्षाची कहाणी उपस्थितांसमोर मांडली.

पालकांनी मुलांना अति सुख-सुविधांमध्ये वाढविण्याऐवजी त्यांना कष्टाचे महत्त्व समजावून सांगावे. मेहनत, शिस्त आणि संस्कार यांच्या बळावरच व्यक्तिमत्त्वाची घडण होते, असे त्यांनी नमूद केले. आई-वडिलांची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असून, पालकांना वृद्धाश्रमात पाठविण्याच्या प्रवृत्तीपासून समाजाने दूर राहावे, असे आवाहन त्यांनी केले. माय-बाप आणि गुरूजी यांना जीवनातील सर्वोच्च स्थान देण्याचा संदेशही त्यांनी दिला.

एकत्र कुटुंबपद्धतीमुळे परस्परांमध्ये प्रेम, सहकार्य आणि संस्कार वाढतात. त्यामुळे कुटुंबव्यवस्थेचे जतन करणे आवश्यक असल्याचे डॉ. लहाने यांनी सांगितले. त्यांनी स्वतः चा जीवनप्रवास तसेच पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलू उपस्थितांसमोर मांडले.

कार्यक्रमाची सुरुवात गणेशाच्या आरतीने झाली. मंडळाच्या कार्याचा आढावा शिवपुत्र आंग्रे यांनी प्रास्ताविकातून मांडला. सतीश हानेगावे यांनी सूत्रसंचालन केले, तर मल्लिकार्जुन लातूरे यांनी आभार मानले.

## किनगाव येथील दुष्काळाची पाहणी; शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्या,रोहित पवारांची मागणी



तभा वृत्तसेवा

किनगाव दि. २२ सप्टेंबर : मराठवाड्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पाहणीसाठी आमदार रोहित पवार सध्या दौऱ्यावर आहेत. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथे पोहोचून त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. पावसाअभावी पिकांचे नुकसान होत असून शेतकरी आणि शेतमजुरांसमोर आर्थिक संकट निर्माण झाल्याचे पवारांनी सांगितले.

पाहणीनंतर बोलताना रोहित पवारांनी शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये आणि शेतमजूर कुटुंबांना २५ हजार रुपयांची मदत देण्याची मागणी केली. तसेच जनावरांसाठी तातडीने चारा छावण्या सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली.

पवारांच्या म्हणण्यानुसार, किनगाव परीसरातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून किनगाव ध्येही पावसाची मोठी तूट आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त भागात तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले.

२०20 मधील पीक विम्याची प्रलंबित रक्कम, मागील वर्षीच्या अतिवृष्टीची मदत आणि कर्जमाफीतील अटींचा मुद्दाही उपस्थित केला.

पवारांनी कर्नाटकातील दुष्काळ जाहीर करण्याच्या निर्णयाचा दाखला देत महाराष्ट्रातही तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. दरम्यान, शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दुष्काळी परिस्थितीबाबत पत्र पाठवून हेक्टरी ५० हजार रुपये मदतीसह विविध मागण्या केल्या आहेत.

## अर्थकारण

डॉ. अश्वनी महाजन

# जग डगमगले, भारताने स्वतःला सावरले

**जागतिक व्यापार तणाव, पश्चिम आशियातील युद्धे, तेलाच्या वाढत्या किमती आणि विस्कळीत पुरवठा साखळ्यांच्या पृष्ठभूमीवर भारताची ७.८ टक्के दराने वाढणारी अर्थव्यवस्था ही केवळ एक आर्थिक आकडेवारी नाही. हे एका बदलत्या भारताचे संकेत आहे, जो आता जागतिक परिस्थितीचा केवळ एक निष्क्रिय प्रेक्षक किंवा बळी राहिलेला नाही.**



संपूर्ण जग युद्धे, व्यापार संघर्ष, ऊर्जा संकट आणि पुरवठा साखळ्यांच्या पुनर्रचनेशी संघर्ष करीत असताना भारताच्या अर्थव्यवस्थेने एक वेगळा मार्ग अवलंबला आणि आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत ७.८ टक्के वास्तविक जीडीपी वाढ नोंदवली. वास्तविक सकल मूल्यवर्धन ८.२ टक्के होते, जे मागील वर्षीच्या याच तिमाहीपेक्षा (७ टक्के) जास्त आहे. एकूण खाजगी उपभोगातील ७.१ टक्के वाढ ही मागील वर्षाच्या ६.८ टक्क्यांपेक्षाही चांगली होती. हा आकडा केवळ बाजाराच्या अपेक्षांपेक्षा जास्त नाही, तर भारतीय अर्थव्यवस्थेची अंगभूत गतिशीलता आणि बाह्य धक्के पचवण्याची तिची क्षमता देखील अधोरेखित करतो.

गुंतवणूक, उत्पादन, सेवा आणि देशांतर्गत मागणी यांच्या तुलनेने संतुलित मिश्रणामुळे ही वाढ झाली. एकूण स्थिर भांडवल निर्मितीमधील लक्षणीय ११.९ टक्के वाढीने गुंतवणूक चक्राची ताकद दर्शवली, ज्यात उत्पादन क्षेत्र ९.२ टक्के आणि सेवा क्षेत्र १० टक्क्यांनी विस्तारले. खाजगी अंतिम उपभोग खर्चातील ७.१ टक्के वाढीने हे दाखवून दिले की, जागतिक अनिश्चितता असूनही भारतीय ग्राहकांची मागणी स्थिर राहिली.

### जीडीपी आकडेवारीवरील चर्चा

विरोधी पक्ष जीडीपी वाढीला आकड्यांचा खेळ आणि जनसंपर्काचा खेळ म्हणत आहेत. त्यांच्या मते, वास्तविक वाढ केवळ २.६ टक्के आहे, तर पंतप्रधान आणि सरकार याला भारतीय अर्थव्यवस्था बुडत असल्याचा दावा करणाऱ्यांना दिलेले उत्तर म्हणत आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, जेव्हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला 'मृत अर्थव्यवस्था' म्हटले होते, तेव्हा विरोधी पक्षनेत्यांनीही तीच भावना व्यक्त केली होती.

वास्तविक पाहता, २०२६ मध्ये भारताने जीडीपीची गणना करण्यासाठी एक नवीन मालिका आणि सुधारित पद्धत स्वीकारली आहे, ज्यासाठी २०२२-२३ हे आधारभूत वर्ष असून, जीएसटी आणि ई-वाहने यासारख्या अधिक चांगल्या डेटा स्रोतांचा वापर केला आहे. सरकारने याला अधिक व्यापक आणि अचूक म्हटले आहे. सरकारने 'प्राईस डिफ्लेटर'च्या प्रश्नावरही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. तथापि, विरोधी पक्ष भारताची विकासाची गाथा स्वीकारण्यास तयार नाही. ते पंतप्रधानांच्या परकीय चलन साठा जपण्याच्या आवाहनावर (परदेश दौरे पुढे ढकलून आणि सोने न खरेदी करून) टीका करीत आहेत. पंतप्रधानांनी आपले परदेश दौरे थांबवून एक आदर्श घालून द्यावा, असा त्यांचा युक्तिवाद आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे म्हणतात की, जीडीपीचे आकडे केवळ एक देखावा आहे. महागाई, बेरोजगारी आणि असमानतेमुळे जनता आधीच त्रस्त असताना, सरकारला जनतेला आर्थिक आकडेवारीत गुंतवून ठेवायचे आहे.

प्रश्न असा आहे की, आकडेवारीमध्ये फेरफार करणे शक्य आहे का? खरे तर, जीडीपीची आकडेवारी एका व्यापक आणि पारदर्शक प्रक्रियेवर आधारित असते, ज्यात उत्पादन आकडेवारी, औद्योगिक उत्पादन निर्देशक, पायाभूत सुविधा, वीज आणि गॅसचा वापर, वाहन उत्पादन, बंदरांवरील वाहतूक, हवाई मालवाहतूक आणि वाहन नोंदणी यांसारख्या असंख्य निर्देशकांचे संकलन केले जाते. हे निर्देशक एप्रिल-जून २०२६ च्या पहिल्या तिमाहीत मोठी वाढ दर्शवतात. अन्नधान्य उत्पादनात ४.८ टक्के, तयार पोलादाच्या वापरात ८.२ टक्के, पायाभूत सुविधा/बांधकाम क्षेत्रातील औद्योगिक उत्पादन निर्देशकांमध्ये ७.५ टक्के, विजेच्या वापरात ९.३ टक्के, व्यावसायिक वाहनांच्या विक्रीत १८.३ टक्के, तीन चाकी वाहनांच्या विक्रीत २९.७ टक्के, प्रमुख बंदरांवरील माल हाताळणीत ६.२ टक्के, देशांतर्गत वाहन नोंदणीत १५.९ टक्के, मालवाहू वाहनांच्या नोंदणीत २०.५ टक्के आणि भांडवली वस्तूंच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकात १५.२ टक्के वाढ झाली. ही सर्व आकडेवारी पारदर्शकपणे उपलब्ध आहे. त्यामुळे जे लोक जीडीपीच्या आकडेवारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहेत, त्यांना एकतर जीडीपीच्या गणनेचे ज्ञान नाही किंवा ते राजकीय कारणांसाठी विनाकारण देश आणि सरकारला लक्ष्य करू इच्छितात.

### गुंतवणुकीत अभूतपूर्व वाढ

विशेषतः गेल्या वर्षीच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत सकल स्थिर भांडवल निर्मिती वाढ ५.८ टक्क्यांवरून ११.९ टक्क्यांपर्यंत दुप्पट झाली आहे. उल्लेखनीय म्हणजे, गेल्या पाच वर्षांपासून जीडीपीच्या टक्केवारीनुसार जीएफसीएफ सातत्याने ३२ टक्क्यांच्या आसपास राहिला आहे, ज्यामुळे भारताला जगातील सर्वांत वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आणि एकूण चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था म्हणून स्थान मिळाले आहे. या वर्षीच्या पहिल्या तिमाहीत जीडीपीमधील जीएफसीएफचा वाटा ३१.४ टक्क्यांवरून ३४.३ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. जर वाढीव भांडवल उत्पादन गुणोत्तर ४:१ मानले, तर जीडीपी वाढ सातत्याने ८ टक्क्यांच्या आसपास राहू शकते, असे सूचित होते. तथापि, केवळ एका तिमाहीतील आकडेवारी याची हमी देऊ शकत नाही. सरकारने आपल्या धोरणांमध्ये सतर्क राहून हा कल कायम ठेवला पाहिजे. गेल्या दशकातील आर्थिक प्रवासाचे सार हे आहे की, सरकारने एक व्यासपीठ तयार केले आहे. सरकार रस्ते, बंदरे आणि डिजिटल पायाभूत सुविधा पुरवू शकते, परंतु उद्योग, नवीन व्यवसाय आणि नवोपक्रम हे उद्योजकांनीच उभारले पाहिजेत. पहिल्या तिमाहीतील खाजगी गुंतवणुकीची वाढती चिन्हे महत्त्वपूर्ण आहेत, कारण हा कल असाच सुरू राहिल्यास भारताचा विकासाचा प्रवास एका नवीन टप्प्यात प्रवेश करू शकतो.

### ३५ वर्षांत प्रथमच 'ए' मानांकन

जपानी मानांकन संस्था जेसीआरने गेल्या आठवड्यात भारताचे सार्वभौम पत मानांकन (सॉवरेन क्रेडिट रेटिंग) इइइ(+) वरून ए(-) पर्यंत श्रेणी सुधारित केले आहे, ज्याचा अर्थ, संस्थेनुसार, भारतीय अर्थव्यवस्थेचा दृष्टिकोन स्थिर आहे. गेल्या ३५ वर्षांत कोणत्याही जागतिक मानांकन संस्थेने भारताला या श्रेणीत स्थान देण्याची ही पहिलीच वेळ आहे. उर्वरित आंतरराष्ट्रीय संस्थांनी अद्याप भारताच्या मानांकनाचे पूर्णपणे मूल्यांकन केले नसले तरी, जेसीआरने भारताचे मानांकन श्रेणीसुधारित करणे महत्त्वपूर्ण आहे. या मानांकन श्रेणीसुधारणेचा जागतिक स्तरावर भारताच्या गुंतवणुकीच्या वातावरणावर सकारात्मक परिणाम होतो आणि कंपन्यांसाठी कर्ज घेणे स्वस्त व सोपे होते.

भारत दीर्घकाळापासून जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि त्याने आपल्या कर्जावरील व्याज किंवा मुद्दल परतफेडीत कधीही चूक केलेली नाही. परकीय चलन साठा उच्च आहे. हा देश तंत्रज्ञान, संरक्षण, दूरसंचार, अवकाश आणि डिजिटल पेमेंट या क्षेत्रांमध्ये नवीन मापदंड स्थापित करीत आहे. अलिकडेच, भारताने जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनण्याचा मान मिळवला आहे. भारतीय बँकिंग क्षेत्रही भूतकाळातील समस्यांवर मात करीत आहे, पतपुरवठ्याची वाढ २० टक्क्यांपेक्षा जास्त झाली आहे.

आकडेवारीपेक्षाही मोठा प्रश्न हा आहे की, बाह्य धक्क्यांच्या काळात भारताला टिकवून ठेवणारी ताकद कोणती होती? याचे उत्तर आहेः

– **देशांतर्गत मागणीची स्थिरता :** भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने देशांतर्गत वापरावर आधारित आहे, ज्यामुळे जागतिक व्यापारातील घसरणीचा परिणाम कमी झाला. जेव्हा जागतिक मागणी कमकुवत होते, तेव्हा बाह्य बाजारांवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्था अधिक असुरक्षित होतात, परंतु भारताची परिस्थिती वेगळी आहे. पहिल्या तिमाहीतील खाजगी वापरात झालेली ७.१ टक्के वाढ हे दर्शवते की, भारतीय कुटुंबांची मागणी ही विकासाची एक प्रमुख चालक शक्ती आहे.

– **धोरणात्मक हस्तक्षेप :** सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्कात केलेली कपात आणि आरबीआयने व्याजदरात केलेले बदल यामुळे गुंतवणूक आणि वापराला चालना मिळाली, तसेच महागाईचा दबाव नियंत्रणात राहिला.

– **प्रादेशिक विविधीकरण :** उत्पादन आणि सेवा या दोन्ही क्षेत्रांतील दमदार कामगिरी तसेच निर्यातीतील १२ टक्के वाढीमुळे अर्थव्यवस्थेचे एकतर्फी जोखमींपासून संरक्षण झाले.

### जागतिक दबाव आणि भारताचे आर्थिक कवच

जागतिक अर्थव्यवस्था अनेक दबावांशी झुंज देत आहे. अमेरिका-चीन व्यापार तणाव आणि पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक व्यापार आणि ऊर्जा बाजारपेठा अस्थिर झाल्या आहेत. सप्टेंबर २०२६ मध्ये ब्रेंट क्रूडच्या किमती प्रति बॅरल १०० डॉलर्सच्या वर गेल्या, ज्यामुळे आयात खर्च, महागाई आणि रुपयावर दबाव वाढला आणि सेन्सेक्स जवळपास ३,००० अंकांनी घसरला. असे असले तरी, गेल्या दशकात भारतीय अर्थव्यवस्थेच्या मूलभूत रचनेत झालेले बदल तिला बाह्य धक्क्यांपासून वाचवत आहेत. भारताची अर्थव्यवस्था आता केवळ निर्यातीवर अवलंबून नाही; तिचे चार मजबूत आधारस्तंभ आहेतः

– **देशांतर्गत मोठी बाजारपेठ :** भारताची सर्वांत मोठी आर्थिक ताकद तिच्या मोठ्या ग्राहक बाजारपेठेत आहे. जेव्हा जागतिक मागणी कमकुवत होते, तेव्हा बाह्य बाजारपेठांवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्था अधिक असुरक्षित होतात, परंतु भारताची परिस्थिती वेगळी आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीतील खाजगी उपभोगातील ७.१ टक्के वाढ हे सिद्ध करते की, भारतीय कुटुंबांकडून असलेली मागणी विकासाचा एक प्रमुख चालक आहे.

– **उत्पादन आणि सेवा यांचे मिश्रण :** भारताचे मॉडेल उत्पादन, सेवा, डिजिटल अर्थव्यवस्था आणि देशांतर्गत उपभोग यांच्या मिश्रणात विकसित होत आहे. एकूण मूल्यवर्धनात सेवांचा वाटा निम्म्याहून अधिक आहे. २०२४ मध्ये जागतिक सेवा व्यापारात भारताचा वाटा ४.३ टक्के होता. २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत औद्योगिक क्षेत्रात ७ टक्के आणि उत्पादन क्षेत्रात ८.४ टक्के वाढ झाली. त्यामुळे भारताचे ध्येय केवळ 'जगाचा कारखाना' बनण्याचे नसून, उत्पादन, डिझाईन, डिजिटल सेवा, वित्तीय सेवा आणि नवोन्मेष यांचे केंद्र बनण्याचे आहे.

– **भौतिक पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक :** गेल्या काही वर्षांमध्ये सरकारी भांडवली खर्चातून रस्ते, रेल्वे, बंदरे आणि डिजिटल पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. आता, खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीची पुढची लाट त्याच पायावर उभारणी करत आहे. कोविडनंतर अमेरिका, युरोप आणि जपानने 'चायना प्लस वन' धोरण स्वीकारले, ज्यामुळे भारतासाठी एक सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. या संधीचे गुंतवणुकीत रूपांतर करण्यासाठी बंदरे, रस्ते, वीज, जमीन, कौशल्ये आणि लॉजिस्टिक्स यासारख्या घटकांची आवश्यकता आहे, ज्यावर भारताने अलिकडच्या वर्षांत काम केले आहे. आर्थिक सर्वेक्षणानुसार, भौतिक पायाभूत सुविधांसोबतच डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि स्वच्छ ऊर्जा यांचाही सर्वसमावेशक पायाभूत सुविधांचा भाग म्हणून विचार केला जातो.

– **डिजिटल पायाभूत सुविधा :** भारताची डिजिटल क्रांती ही आर्थिक सार्वभौमत्वासाठी एक नवीन पाया आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये, युपीआयवर २४.५१ अब्ज व्यवहार (अंदाजे ३१४ अब्ज डॉलर्स मूल्याचे) झाले आणि ही प्रणाली आता ११ देशांमध्ये कार्यरत आहे. डिजिटल ओळख, डिजिटल पेमेंट आणि बँकिंग सुविधेमुळे व्यवहाराचा खर्च कमी झाला आहे आणि आर्थिक व्यवहारांना औपचारिक स्वरूप प्राप्त झाले आहे.

### आयात आणि निर्यातीत सुधारणा

गेल्या वर्षीच्या पहिल्या तिमाहीत निर्यातीत ६.० टक्के आणि आयातीत ५.३ टक्के अशी माफक वाढ झाली होती. तथापि, या वर्षी निर्यातीची वाढ १२ टक्के झाली आहे आणि आयातीत १.१ टक्के घट झाली आहे. यापूर्वी, व्यवहार तोलातील असंतुलन आणि परकीय संस्थात्मक गुंतवणुकीच्या बहिर्प्रवाहामुळे परकीय चलन साठ्यावर दबाव होता आणि रुपया सतत कमकुवत होत होता. पुरवठा साखळीतील व्यत्यय आणि वाढत्या तेलाच्या किमतींनी परिस्थिती आणखी बिकट केली. तथापि, निर्यातीतील लक्षणीय वाढ आणि आयातीतील घट हा एक दिलासादायक बाब आहे. शिवाय, रिझर्व्ह बँकेच्या विशेष स्वॅप योजनेमुळे परदेशातील अनिवासी भारतीयांनी केलेल्या भरीव परकीय चलन ठेवींमुळे परकीय चलन साठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे, ज्यामुळे भारतीय रुपया मजबूत होण्याची शक्यता आहे. ●●●

(पांचजन्यवरून साभार)


---

## प्रासंगिक

अरविंद कुमार मिश्रा

**कुप्प. सी. सुदर्शनजी यांनी आदिवासी समाजातील धर्मांतर आणि देशातील घुसखोरी या कारणांचा सर्वंकष अभ्यास करून समाज आणि सरकारला सतर्क केले.**

# सुदर्शनजी भारतीय विकासाचे खंदे समर्थक



**रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक कुप्प. सी. सुदर्शनजी यांचा १५ सप्टेंबर रोजी स्मृतिदिन होता. त्यानिमित्त...**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरसंघचालक कुप्पाहली सीतारामय्या सुदर्शनजी यांचा जन्म १८ जून १९३१ रोजी रायपूर, छत्तीसगड येथे श्री सीतारामय्या यांच्या पोटी झाला. कर्नाटकातील मंड्या जिल्ह्यातील कुप्पाहल्ली हे गाव त्यांचे वडिलोपार्जित घर होते. तथापि, त्यांचे पूर्वज तामिळनाडूतील संकेतीचे रहिवासी होते, म्हणून त्यांची मातृभाषा शकाईती ही तामिळ आणि तेलुगू मिश्रित होती. त्यांचे पूर्वज २५० वर्षांपूर्वी तामिळनाडूतून कर्नाटकात स्थलांतरित झाले.

वडील सीतारामय्या हे वनविभागात कार्यरत होते आणि नोकरीनिमित्त मध्यप्रदेशातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये तैनात होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण बैतूल, दमोह, रायपूर, मांडला इत्यादी ठिकाणी झाले. आजच्या महाराष्ट्रातील चंद्रपूर हे त्यावेळी मध्यप्रदेशात होते. त्यामुळे त्यांचे वडील चंद्रपूरला तैनात असताना त्यांनी तिथल्या ज्युबिली हायस्कूलमधून हायस्कूलची परीक्षा उत्तीर्ण केली. १९४७-१९४८ मध्ये ते जबलपूरला आले आणि त्यांनी येथील रॉबर्टसगंज कॉलेजमधून इंटरमिजिएटचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी १९५४ मध्ये दूरसंचार विषयात बीई केले. पुढच्याच वर्षी त्यांनी मिशनरी जीवनात प्रवेश केला.

पूज्य श्री रामशंकर अग्निहोत्री हे जिल्हा प्रचारक होते, त्यांच्या संपर्कात आल्यानंतर ते संघ कार्यात सक्रिय झाले. ते जांजगीर चंपा शक्तीचे तहसील प्रचारक आणि सागरचे जिल्हा प्रचारक होते. सुदर्शनजी रीवा येथे विभाग प्रचारकही होते. १९६४ मध्ये त्यांना मध्य भारताच्या प्रांतीय धर्मोपदेशकाची जबाबदारी मिळाली. १९६९ मध्ये ते अखिल भारतीय भौतिक प्रमुख बनले. या काळात त्यांनी नियुधा या स्वसंरक्षणाची शैली आणि शस्त्राशिवाय हल्ला, शारीरिक कार्यक्रमात समाविष्ट केले. १९७५ मध्ये आणिबाणी जाहीर झाली आणि पहिल्याच दिवशी त्यांना इंदूरमध्ये अटक करण्यात आली. त्यांनी १९ महिने तुरुंगात काढले. येथे त्यांनी विविध पंथ आणि धर्मांच्या लोकांशी संवाद साधला आणि अनेक पुस्तकांचा अभ्यास केला.

### पूर्वांचल आणि पंजाब

१९७७ मध्ये ते पूर्वांचलचे क्षेत्र प्रचारक बनले, तेथील समाजात ते इतके तल्लीन झाले की, त्यांना ईशान्येतील अनेक भाषा कळू लागल्या. येथे त्यांनी आदिवासी समाजातील धर्मांतर आणि देशातील घुसखोरी याच्या कारणांचा सखोल अभ्यास आणि चर्चा करून समाज आणि सरकारला सतर्क केले. आदिवासी समाजाची श्रद्धा जपण्यासाठी त्यांनी उपाययोजना सुचवल्या. या क्रमाने आदिवासी भागात वसतिगृहे, शाळा आणि सेवा प्रकल्प उभारण्यात आले. त्यांनी राणी माँ गाईदिन्लूंसोबत आसाममध्ये ठिकठिकाणी प्रवास केला आणि आदिवासी समाजातील वाढत्या धार्मिक धर्मांतराविरोधात जनजागृती केली.

९० च्या दशकात अशांत पंजाबमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात त्यांनी प्रमुख भूमिका बजावली. त्यांनी केवळ श्री गरू ग्रंथ साहिबचाच अभ्यास केला नाही, तर त्यांनी गुरुवाणीचे अनेक भाग आठवले आणि इतरांना प्रेरणाही दिली. १९७९ मध्ये त्यांना अखिल भारतीय बौद्धिक प्रमुखपदाची जबाबदारी मिळाली. संघाच्या ऐक्याचा स्रोत वैश्विक आणि लाखो आवाजांसाठी अनुकरणीय बनवण्यात त्यांचा अथक प्रवास महत्त्वाचा होता. १९९० मध्ये ते सरकार्यवाह झाले. प्रो. राजेंद्र सिंहजी उपाख्य रज्जूभय्या यांच्या पश्चात १० मार्च २००० रोजी ते सरसंघचालक झाले. २१ मार्च २००९ पर्यंत ते सरसंघचालक होते. सुदर्शनजी पर्यावरण रक्षणाबाबत अत्यंत जागरूक होते.

### सेंद्रिय शेतीचे खंबीर समर्थक

सुदर्शनजी सेंद्रिय शेतीचे जोरदार पुरस्कर्ते होते. त्याचबरोबर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी तयार केलेल्या संकरित बियाणे आणि जनुकीय सुधारित बियाणांच्या नकारात्मक परिणामांबाबत संशोधकांना इशारा देण्यात आला. जीवाश्म इंधनांना पर्याय म्हणून बायोडिझेल इत्यादींच्या विकासासाठी नेहमी शास्त्रज्ञांशी संवाद साधला. दैनंदिन जीवनात पाणी आणि संसाधनांचा कमीत कमी वापर करण्याचे ते स्वतः एक आदर्श उदाहरण होते. सरसंघचालकांच्या जबाबदारीतून मुक्त झाल्यानंतर त्यांचे केंद्र भोपाळ बनले, त्यांनी संघ कार्यालयाच्या छतावरच रासायनिक खतांपासून मुक्त भाजीपाला लागवडीची पद्धत विकसित केली. त्याला बायपास शस्त्रक्रिया करावी लागली, पण बाटलीच्या रसाचे सेवन करून त्याने स्वतःला निरोगी ठेवले. ●●●

(पांचजन्यवरून साभार)

### गाय, गाव आणि शेती

गाय, गाव आणि शेतीवर आधारित अर्थव्यवस्था त्यांनी शुभ मानली. भारताने शाश्वत विकासापेक्षा शाश्वत वापराला प्राधान्य द्यावे, असा त्यांचा युक्तिवाद होता. अयोध्येत रामाचे भव्य मंदिर उभारले जाईल, त्यापुढील सर्व अडथळे दूर होतील. अशा चिरंतन विचारांनी त्यांनी संपूर्ण पिढीला दिशा दिली. एक दूरदर्शी म्हणून ते म्हणायचे की, २०११ पासून भारताचा असा उदय सुरू होईल, ज्यात जग आपल्याकडे उपाय शोधेल. हे आज प्रत्यक्षात येत आहे. भारतीय ऋषिमुनी आणि महान पर्वत, नद्या, तीर्थक्षेत्रे, ऋषी-मुनी यासारखे भारतीय एकात्मतेचे सर्व तंतू आपल्यासाठी स्मरणात राहण्यासारखे आहेत, असे ते नेहमी म्हणत. आज मुस्लिम आणि ख्रिश्चनांचा एक मोठा वर्ग मानतो की, त्यांचे पूर्वज हिंदू आहेत, फक्त त्यांची उपासना करण्याची पद्धत वेगळी आहे. यामागे सुदर्शनीसारखे ऋषी आहेत, ज्यांनी हे सत्य सांगायला कधीच मागेपुढे पाहिले नाही. ते मुस्लिम आणि ख्रिश्चनांना अल्पसंख्यक मानत नव्हते, ते सर्व भारतीय पूर्वजांची मुले आहेत, असे म्हणायचे.
सुदर्शनजींनी आपले नेत्रदान केले आणि या जगाचा निरोप घेतल्यानंतरही त्यांनी अंधार दूर करण्याचे कार्य चालू ठेवले. छत्तीसगड हे त्यांचे जन्मस्थान होते आणि हा एक दैवी योगायोग होता की, १५ सप्टेंबर २०१२ रोजी रायपूर येथेच त्यांना मोक्षप्राप्ती झाली. एका कर्मयोगीच्या जीवनाचा हा प्रेरणादायी प्रवास भावी पिढ्यांमध्ये राष्ट्रसेवेची भावना जागृत करीत राहील.

---

## चिंतन

ललित फुलारा

# १९९१ चा लष्करी करार पुरेसा आहे का ?

एका पाकिस्तानी जहाजाची भारतीय नौदलाच्या जहाजाला धडक बसल्यानंतर दिल्लीपासून इस्लामाबादपर्यंत तणाव वाढला आहे. ही घटना १५ सप्टेंबर रोजी घडली. यामुळे १९९१ चा भारत-पाकिस्तान लष्करी करार पुरेसा आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव सीमेपासून समुद्रापर्यंत कायम आहे. भारताला अस्थिर करण्यासाठी आणि भारतामध्ये दहशतवादी कारवाया करण्यासाठी पाकिस्तान कोणतीही कसर सोडत नाही. मागून हल्ला करणे हा पाकिस्तानचा स्वभाव आहे. आता पाकिस्तानने समुद्रातही त्याच डावपेचांचा अवलंब केला आहे. एका पाकिस्तानी जहाजाची भारतीय नौदलाच्या जहाजाला धडक बसल्यानंतर दिल्लीपासून इस्लामाबादपर्यंत तणाव वाढला आहे.

पाकिस्तानी जहाजाची भारतीय नौदलाच्या जहाजाशी टक्कर झाल्यानंतर नवी दिल्लीतील पाकिस्तानच्या प्रभारी राजदूतांना अस्वीकारार्ह आणि अव्यावसायिक वर्तनाबद्दल बोलावण्यात आले. भारताने स्पष्टपणे सांगितले की, पाकिस्तानी जहाजाचे वर्तन हे लष्करी कवायती, डावपेच आणि सैन्याच्या हालचालींसाठी पूर्व माहिती देण्यासंबंधीच्या १९९१ च्या भारत-पाकिस्तान कराराच्या कलम १० चे थेट उल्लंघन होते. यामुळे हा प्रश्न निर्माण होतो की, जेव्हा पाकिस्तान समुद्रात आपल्या कुटील कारवाया सुरूच ठेवतो, तेव्हा १९९१ चा लष्करी करार पुरेसा आहे का? पाकिस्तानचे नौदल जहाज (पीएनएस) हुनैन आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत भारतीय नौदलाच्या युद्धनौकेजवळ अतिवेगाने आले आणि असुरक्षितपणे आपला मार्ग बदलला. पाकिस्तानी जहाजाच्या या कृतीमुळे दोन्ही जहाजांची टक्कर झाली. भारताने तीव्र निषेध नोंदवला आणि पाकिस्तानला कडक इशारा दिला. ही घटना ओमानच्या आखातापासून सुमारे १,८५२ किलोमीटर अंतरावर घडली.

भारतीय युद्धनौका उत्तर अरबी समुद्रात नियमित निगराणी मोहिमेवर होती. या धडकेत पाकिस्तानी जहाजाचे नुकसान झाले. भारतीय नौदलाच्या जहाजाचे कोणतेही नुकसान झाल्याचे वृत्त नसले तरी, या घटनेनंतरही भारतीय युद्धनौकेने आपले अभियान सुरूच ठेवले. तथापि, पाकिस्तानी जहाजाने अशा प्रकारे कृती केली का आणि या कारस्थानामागे पाकिस्तानचा हात होता का, असा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. अशीच एक घटना १४ वर्षांपूर्वी घडली होती. १६ जून २०११ रोजी पाकिस्तानी नौदलाची युद्धनौका पीएनएस बाबर एडनच्या आखातात भारतीय नौदलाच्या आयएनएस गोदावरी या फ्रिगेटच्या जवळून गेली होती. या घटनेत भारतीय युद्धनौकेच्या हेलिकॉप्टर सुरक्षा जाळ्याचेही नुकसान झाले होते. त्यामुळे, १९९१ चा भारत-पाकिस्तान लष्करी करार आता पुरेसा आहे का, असा प्रश्न वारंवार उपस्थित होतो.

### लष्करी करार काय आहे ?

१९९१ च्या भारत-पाकिस्तान लष्करी करारानुसार, दोन्ही देशांनी लष्करी कवायती किंवा सैन्याच्या हालचालींची एकमेकांना आगाऊ माहिती देणे बंधनकारक आहे, जेणेकरून एकमेकांच्या हेतूंबद्दल गैरसमज होऊन उद्‌भवणारे कोणतेही संभाव्य संकट टाळता येईल. मात्र, या घटनेत पाकिस्तानने या लष्करी कराराचे उल्लंघन केले आहे. ●●●

(पांचजन्यवरून साभार)

---

## भारताचा 'तिसरा डोळा'

(पान III वरून)

भारताचा लांब किनारा चक्रीवादळांसाठी असुरक्षित आहे. वारंवार घेतलेल्या उपग्रह छायाचित्रांमुळे वादळाच्या विकासाचे आणि संभाव्य मार्गाचे अधिक चांगले मूल्यांकन करणे शक्य होईल, ज्यामुळे वेळेवर सूचना देणे, अधिक चांगली तयारी करणे आणि प्रभावी स्थलांतर व मदतकार्य करणे शक्य होईल. हा उपग्रह शेती आणि जंगलांवरही देखरेख ठेवेल. उपग्रह डेटा वापरून, पिकांच्या आरोग्यातील बदल, दुष्काळ किंवा पुराचा परिणाम, वनक्षेत्रातील बदल आणि जलाशयांचा विस्तार यांचे कालांतराने मूल्यांकन केले जाऊ शकते. वेगवेगळ्या काळातील प्रतिमांची तुलना केल्याने एखाद्या प्रदेशातील वनस्पती, भू-वापर किंवा जलस्रोतांमधील बदल समजण्यास मदत होईल. भूस्थिर कक्षेमुळे एका मोठ्या क्षेत्राचे अखंड दृश्य मिळेल, ज्यामुळे ढगांची निर्मिती, वाढ आणि हालचाल यांचे निरीक्षण करणे शक्य होईल. अशी माहिती विशेषतः पावसाळ्यातील हवामान प्रणाली आणि पावसाचे व्यापक स्वरूप समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरेल. वेगवेगळ्या काळातील उपग्रह प्रतिमांची तुलना केल्याने दुर्गम आणि संवेदनशील भागांमधील पायाभूत सुविधा, भू-वापर आणि किनारपट्टीच्या क्षेत्रांमधील बदल समजण्यास मदत होईल.

### नवीन अवकाश अर्थव्यवस्था

भारताचे अवकाशातील 'डोळे' आता केवळ सरकारी प्रयोगशाळांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. खाजगी क्षेत्र आणि संशोधन संस्थांचा झपाट्याने वाढणारा सहभाग अवकाश डेटाच्या नवीन उपयोगांसाठी आणि सेवांसाठीच्या शक्यता विस्तारत आहे. अवकाश-आधारित माहिती आणि सेवांची एक नवीन अर्थव्यवस्था आता आकार घेत आहे. अवकाशातील आत्मनिर्भरता केवळ रॉकेट निर्मितीपुरती मर्यादित नाही. त्यात उपग्रह निर्मिती, अवकाशयान प्रणाली, प्रक्षेपण, कक्षीय नियंत्रण, जमिनीवरील नियंत्रण, दळणवळण, डेटा संपादन आणि प्रक्रिया यांचा समावेश होतो. केवळ या सर्व क्षमतांच्या जोरावरच एखादे अवकाश अभियान पृथ्वीवर उपयुक्त परिणाम देऊ शकते. ईओएस-०५ या व्यापक अवकाश परिसंस्थेमधील एक महत्त्वाचा दुवा आहे, जो भारताच्या पृथ्वी निरीक्षण क्षमतांना अधिक बळकट करतो. याच्या माध्यमातून अवकाशातून मिळवलेल्या डेटाचा उपयोग कृषी, जलस्रोत, आपत्ती व्यवस्थापन आणि पर्यावरण निरीक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये केला जाईल, ज्यामुळे विकासाचे निर्णय सुधारण्यास मदत होईल.

**भविष्याकडे निर्देश :** ईओएस-०५ चे महत्त्व या क्षमतेत आहे की, ते भारताला अवकाशातून आपल्या ग्रहाचे अधिक चांगल्या प्रकारे निरीक्षण करण्यास आणि त्याला समजून घेण्यास सक्षम करते. चांद्रयानपासून गगनयानपर्यंत आणि पृथ्वी निरीक्षणापासून भारतीय अंतराळ स्थानकापर्यंत भारताचा अंतराळ प्रवास नवनवीन आयाम जोडत आहे. त्याचे उद्दिष्ट केवळ अंतराळात पोहोचणे नाही, तर अंतराळातील तांत्रिक शक्तीला पृथ्वीवरील जीवन आणि विकासाशी जोडणे हे आहे. ईओएस-०५ हा याच दूरदृष्टीचा एक भाग आहे, जो पृथ्वी-ते-अंतराळ निरीक्षण क्षमता मजबूत करतो आणि अशा भविष्याकडे निर्देश करतो, ज्यात अंतराळ बुद्धिमत्ता भारताची सुरक्षा, विकास आणि एका चांगल्या भविष्यासाठी अधिक उपयुक्त ठरेल. ●●●

(पांचजन्यवरून साभार)

# अखेर महसूल प्रशासन सार्वजनिक दसरा महोत्सव साजरा करण्यास तयार

## उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकडे यांची परिषदेत माहीती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण, ग्रामपंचायत निवडणुका तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांची शक्यता यामुळे महसूल प्रशासनावर येणारा ताण पाहता यावर्षी महसूल व नगर पालिका प्रशासन सार्वजनिक दसरा महोत्सव २०२६ साजरा करण्यासाठी असमर्थता दाखवित होते परंतु ऐतिहासिक परंपरेत खंड पडत असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असतांना अखेर मंगळवार दि २२ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी याव-र्षीही दसरा महोत्सव उत्साहात साजरा केला जाणार असून सर्वसामान्य नागरिकांचा हिरमोड होऊ नये आणि उत्सवाचा आनंद कायम रहावा यासाठी महसूल प्रशास-नाने जय्यत तयारी सुरू केली असल्याची माहीती दिली.

देशातील दुसऱ्या क्रमांकाचा दसरा महोत्सव म्हणून हिंगोलीच्या दसरा महोत्सवाकडे पाहीले जाते. दरवर्षी महसूल प्रशासानाकडे दसरा महोत्सव साजरा करण्याची जबाबदारी असते. मात्र यावर्षी एसआयआर, मतदारांच्या सुनावण्या, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणुका यामुळे दसरा महोत्सव साजरा करता येणार नसल्याचे पत्र महसूल विभागाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना दिले होते. तर नगर पालिकेनेही कामाचा ताण, कर वसुली, आकृतीबंध आराखडाचे कारण सांगत दसरा महोत्सव साजरा करण्यास असमर्थता दर्शविली होती. त्यामुळे दसरा महोत्सवाच्या आयोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

दरम्यान, मंगळवारी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी घुटुकडे यांनी दसरा महोत्सव उत्साहात साजरा करणार असल्याचे जाहीर केले. प्रशासनाकडे कामाचा मोठा ताण आणि विविध कामांचा लोड असला तरीही वर्षभर वाट पाहत असलेल्या सर्वसामान्य जन-तेचा हिरमोड होऊ नये म्हणून या महोत्सवाचे आयोजन करण्याचे नियोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

या महोत्सवाचे बासापूजन दि २५ सप्टेंबर रोजी करण्यात येणार असून दि १० ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबरपर्यंत दसरा महोत्सव साजरा केला जाईल. वेळेच्या कमतरतेमुळे यंदा स्वतंत्र ई टेंडर न देत, महत्वाचे असणारे झुल्याचे आणि गाळ्यांचे टेंडर एकाच व्यक्तीला ठोक पध्द-तीने दिले जाणार आहे. या सर्व प्रक्रियेची थेट खुली बोली पध्दतीने सोमवार दि २८ सप्टेंबर दुपारी १२ वाजता लिलाव काढला जाणार आहे. या लिलावाच्या अनुषंगाने नियमांनुसार सूचना प्रसिध्द केली जाईल आणि दसरा समिती कक्षातून त्याचे नियम व अटी प्राप्त करता येतील. या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शक कारभार रह-ावा यासाठी व्हीडीओ चित्रीकरण देखील केले जाणार आहे. प्रशासनाच्या या निर्णयाचे नागरिकांनी स्वागत केले असून दसरा महोत्सवाचे आयोजन होणार असल्याने नागरिकांमधून आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# एल निनो येणार हे सरकारला माहीत असूनही सरकार झोपेत

## आ. रोहीत पवार यांची राज्य सरकारवर टीका



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

राज्यात एल निनो येणार हे सरकारला माहीत होते. तामिळनाडू सरकारने एल निनो पूर्वीच शेतकऱ्यांना काय मदत दिली जाणार हे जाहीर केले होते. मात्र आपल्या राज्य सरकारला काय झाले होते. सुरूवातीला सरकारने एल निनो बाबत भाष्य केले परंतु जुलै महिन्यात पाऊस पडल्यानंतर त्यांना विसर पडला. ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये पाऊस झाला नाही. सरकारने यापूर्वीच शेतकऱ्यांच्या मदतीचा निर्णय घ्यावयास हवा होता. मात्र राज्य सरकार झोपलेले असून आता हे सरकार जागे झाले पाहीजे अशी टीका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आ. रोहीत पवार यांनी केली.

सोमवारी आ. रोहीत पवार यांनी जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीची पाहणी केली. यावेळी कळमनुरी तालुक्यातील कळमकोंडा येथील पीक पाहणी केल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ॲड रवी शिंदे, माजी जि प उपाध्यक्ष मनिष आखरे, माधव कोरडे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

यावेळी बोलतांना आ. रोहीत पवार म्हणाले की, मंत्री दुष्काळ परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौरे काढत आहेत. शेती पिकांची पाहणी करीत आहेत. परंतु त्यांना विचारणा केली असता मुख्यमंत्र्याना निर्णय घेण्याचे अधिकार आहेत असे सांगितले जाते. सर्वच निर्णय मुख्यमंत्री घेणार असतील तर तुम्ही घरी बसा अन मुख्यमंत्र्यांनाच पाहणी करण्यासाठी पाठवा अशी टीका यावेळी आ. पवार यांनी केली. दुसरीकडे मंत्री बैठकामधून काजू बदाम खात आहेत हे पाहील्यानंतर शेतकरी चिडणारच. शासनाचा प्रशासनावर वचक रा-हीला नाही. राज्यातील पीक कर्ज माफीवर बोलतांना ते म्हणाले की, अजूनही ९० टक्के शेतकरी कर्जमाफीपासून वंचीत आहेत. राज्य सरकारने तत्काळ दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रूपये आर्थिक मदत करावी, दुष्काळसंदर्भात उपाययोजना कराव्यात, शेतमजूरांना प्रत्येक २५ हजार रूपये मदत द्यावी, चारा छावण्या उभाराव्यात अशीही मागणी यावेळी आ. पवार यांनी केली.

# रक्तदान हेच श्रेष्ठदान- पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

रक्तदान केल्यामुळे अपघातातील जखमी, गरोदर माता तसेच इतर रूग्णांना जीवनदान मिळते. त्यामुळे रक्तदान हे श्रेष्ठदान असल्याचे प्रतिपादन पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा यांनी केले.

येथील शासकीय रूग्णालयात पोलिस विभागाच्यावतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे यांच्यासह जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ नितीन तडस, डॉ दिपक मोरे, डॉ गोपाल कदम, रक्तपेढीतील टीम आणि डॉ पठाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलतांना पोलिस अधीक्षक डॉ लोढा म्हणाले की, सध्या शासकीय दवाखान्यात रक्ताचा तुटवडा होत आहे. वेळे-वर रक्त न मिळाल्यास रूग्णांना प्राण गमवावे लागतात. त्यामुळे गणेशोत्सव काळात सामाजिक संघटनासह इतर स्वयंसेवी संघटना आणि गणेश मंडळांनी जास्तीत जास्त रक्तदान शिबीरांचे आयोजन करून रक्तदान करावे जेणेकरून शासकीय रूग्णालयात दाखल होणाऱ्या गोरगरीब रूग्णांना त्याचा लाभ होईल. अनेक जणांना जीवनदान मिळेल. यावेळी पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच इतर नागरिकांनीही मोठ्या संख्येने रक्तदान करीत आपले कर्तव्य बजावले.



**हिंगोली- शहरात सध्या विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी परजिल्ह्यातून भाविक मोठ्या संख्येने हिंगोली शहरात दाखल होत आहेत. परंतु येथील महावीर चौक, गांधी चौक, इंदिरा चौक या भागात अस्ताव्यस्त वाहने, गाड्यांमुळे वाहतुकीची कोंडी होत असून त्याचा त्रास भाविकांना होत आहे.**

## संक्षिप्त वृत्त

### राज्य व्यसनमुक्त व्हावे- विशाल अग्रवाल

हिंगोली- राज्यातील ज्वलंत समस्येतील व्यसनांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी जेव्हा गणेशभक्त व्यसनमुक्ती प्रचार आणि प्रसारार्थ पुढाकार घेण्याचा संकल्पबद्ध होतील तेव्हा, महाराष्ट्र व्यसनमुक्त होईल असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांनी येथे केले आहे. नशामुक्त भारत अभियान अंतर्गत, नशामुक्त भारत अभियान समिती, जिल्हा परिषद समाज कल्याण, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली येथील बुरूड गल्लीत मित्र परिवार गणेश मंडळाच्या परिसरात व्यसनमुक्ती पोस्टर प्रदर्शन पार पडले. जिल्हा पदाधिकारी विशाल अग्रवाल, मंडळाचे अध्यक्ष किरण जाधव, उपाध्यक्ष सुमित कदम, सचिव आदित्य गुडमलवार आदींची उपस्थिती होती. नशाबंदी मंडळ प्रकाशित व्यसनमुक्ती पोस्टर प्रदर्शन पार पडले. गणेशोत्सव परिसरातील नागरिकांना तंबाखू दुष्परिणामांबाबत जनजागरण करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांच्या हस्ते तंबाखूमुक्तीची प्रतिज्ञा देखील देण्यात आली.

### उद्योजकांसाठी जिल्हास्तरीय परिषद २०२६

हिंगोली- जिल्हा उद्योग केंद्र, हिंगोली यांच्यावतीने जिल्ह्यात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी तसेच उद्योजक व गुंतवणूकदारांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी 'जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद-२०२६ आयोजित करण्यात येणार आहे. पुढील आठवड्यात होणाऱ्या या परिषदेत जिल्ह्यातील उद्योजक व गुंतवणूकदारांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक आयुक्त (उद्योग व सेवा) अनिल कदम यांनी केले आहे. उद्योग मंत्री, पालकमंत्री, जिल्ह्यातील सर्व खा-सदार, आमदार तसेच जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, हिंगोली यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली ही परिषद होणार आहे. या परिषदे दरम्यान विविध उद्योग घटकांसोबत सामंजस्य करार (एमओयू) करण्यात येणार आहे. जिल्ह्यात गुंतवणूक वाढविणे, स्थानिक उद्योजक व गुंतवणूकदारांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे, जिल्ह्याच्या तसेच राज्याच्या आर्थिक विकासाला चालना देणे आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे, हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे. या परिषदेत हिंग-ोली जिल्ह्यातील प्रमुख उद्योग क्षेत्रे, गुंतवणुकीच्या उपलब्ध संधी, उद्योजकांचे अनुभव कथन तसेच उद्योग क्षमता असलेल्या विविध क्षेत्रांतील गुंतवणूक व व्यवसायाच्या संधींबाबत चर्चा होणार आहे. यासोबतच सामंजस्य करारांच्या स्वाक्षरीचा कार्यक्रमही आयोजित करण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी जिल्ह्यातील उद्योग व गुंतवणूकदारांनी या परिषदेत सहभागी व्हावे. सामंजस्य करारा बाबत, सहभाग नोंदविणे अथवा परिषदेत सहभागी होण्यासंदर्भात अडचणी असल्यास अनिल कदम , सहाय्यक आयुक्त (उद्योग व सेवा), जिल्हा उद्योग केंद्र, एस १२, दुसरा मजला मध्यवर्ती प्रशाकीय इमारत नांदेड रोड, हिंगोली येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### २६३ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २६३ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाने कारवाई केली असून वाहन चालकांकडून २ लाख ५० हजार ७५० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# आदर्श ग्रामपंचायत बनविण्यासाठी प्रत्येकाने सक्रिय व्हा- गायकवाड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

आजपासून कंजारा गावाच्या आदर्श ग्रामपंचायतीच्या प्रवासाला सुरुव-ात झाली आहे. गावाला आदर्श ग्रामपंचायत बनविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग घेऊन एकजुटीने काम करणे आवश्यक आहे. आदर्श गाव निर्माण करण्याची प्रक्रिया ही विविध घटकांवर आधारित असून त्यातील प्रत्येक घटकाकडे गांभीर्याने लक्ष देऊन काम केले पाहिजे. एकही गुण गमावला जाऊ नये, यासाठी ग्रामपंचायत, गाव विकास समिती आणि ग्रामस्थांनी समन्वयाने काम करावे, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केले.

महाराष्ट्र फाउंडेशन, ग्रामपंचायत कंजारा, उगम ग्रामीण विकास संस्था आणि गाव विकास समिती, कंजारा यांच्या संयुक्त विद्यमाने कंजारा येथे विशेष गावसभेचे आयोजन करण्यात आले. या विशेष गावसभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड होते.

पुढे बोलतांना गायकवाड म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान आणि 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' हे दोन्ही उपक्रम केवळ शासकीय अभियान न राहता ते गावाचे स्वतःचे अभियान असल्याची भावना प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी गावात विविध समित्या व गट गठीत करून त्यांच्यामार्फत नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याची गरज असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दयानंद कल्याणकर यांनी केले. यावेळी उगम ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव यांनी सांगितले की, कंजारा गा-वात २३ महिला बचत गट कार्यरत आहेत. या बचत गटातील महिलांना विविध व्यवसाय व उद्योगांच्या माध्यम ातून उद्योजक बनविण्यासाठी विविध फाउंडेशनच्या सहकार्याने प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच गावामध्ये पंचम एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम राबविण्यासाठी उगम ग्रामीण विकास संस्था पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञ रोहिणी शिंदे यांनी शेती व पशुधन क्षेत्रातील विविध प्रशिक्षण व मार्गदर्शनाची माहिती दिली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत केशव गड्डाफोड यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची सविस्तर माहिती दिली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानाची माहिती दिली. प्रकल्प संचालक (जिग्राविय) नामदेव केंद्रे यांनी घरकुलाचे उद्दिष्ट पूर्ण करणे, आणखी चार महिला बचत गट स्थापन करणे, १३५ महिलांना लखपती बनविणे, शेतकरी उत्पादक कंपनी (ऋझ्झउ) स्थ-ापन करणे, युवकांची यादी तयार करून त्यांना कौशल्य प्रशिक्षण देणे, कर्जासाठी पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करणे आणि गटशेतीसाठी महिलांना एकत्रित करण्याबाबत मार्गदर्शन केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे यांनी सेवा संकल्प अभियानाची माहिती देताना गावातील लोकसहभागाचे महत्त्व स्पष्ट केले. ग्रामसभेच्या म ाध्यमातून दाखले वितरण, स्वच्छता, जलसंधारणाची कामे तसेच महिला व बालकांच्या पोषणासंबंधी उपक्रम राबविण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी गावातील नागरिकांना आयुष्म ान भारत कार्ड, जन्म दाखले, घरकुल कार्यारंभ आदेश आणि विवाह प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक पाटोदकर आणि गोविंद अंभोरे यांनी केले तर आभार प्रवीण कल्याणकर यांनी मानले. कार्यक्रम ासाठी दिशांत पाईकराव, धनंजय पडघन, भीमराव पाईकराव, ओंकार भालेराव, सिद्धार्थ निनूले, विकास कांबळे, प्रदीप बोंढारे, ग्राम पंचायत अधिकारी हणवते, विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी, प्रकल्प अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांची उपस्थिती होती तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी गावकऱ्यांनी प्रयत्न केले.

# पवार पब्लीक स्कूलमध्ये एक पेड माँ के नाम कार्यक्रमाला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पवार पब्लिक स्कूल येथे 'जायंटस सेवा सप्ताह' अंतर्गत 'एक पेड माता के नाम' उपक्रम शनिवारी राबविण्यात आला.

प्रणव शिवाजीराव पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेच्या परिसरात लिंब, चिंच, जांभूळ यांसह विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणानंतर लावलेल्या रोपांचे नियमित संगोपन, पाणी देणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची शपथ उपस्थितांनी घेतली. वाढदिवसाला रोप लावून ते जगविण्याचा संकल्प हीच पर्यावरणाला खरी भेट, असा संदेश यावेळी देण्यात आला. देशी वृक्षांमुळे परिसरातील जैवविविधता टिकविण्यासोबतच भविष्यात शाळेचा परिसर अधिक हिरवागार होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमास जायंटस ग्रुपचे अध्यक्ष डॉ. नामदेव कोरडे, फेडरेशन उपाध्यक्ष रत्नाकर महाजन, उपाध्यक्ष डॉ. गणेश अवचार, महेश शहाणे, किशन राठोड, बालाजी गव्हाणे, एम. आर. राठोड, विलास जोशी तसेच सुभेदार विनोद पाटील, श्याम वाकोडे, गजानन आवटे, महेंद्रसिंग, वैभव कांबळे यांची उपस्थिती होती. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका, कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रणव पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# लोकसंवाद कार्यक्रमात सायबर फसवणूकीबाबत मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लोकसंवाद उपक्रमांतर्गत चिंताम णी गणेश मंडळ लक्ष्मीनगर, अयेथे आयोजित लोकसंवाद कार्यक्रमात नागरिकांना सायबर फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यश शर्मा होते. यावेळी पोलीस विभाग सायबर सेलचे इरफान पठाण यांनी नागरिकांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी विविध उपाययोजनांची माहिती दिली. पासवर्ड कोणालाही सांगू नये, असे आवाहन त्यांनी केले. अनोळखी लिंक, बँक, पो-लीस किंवा शासकीय अधिकारी असल्याचे सांगून फोन करणाऱ्या व्यक्तींवर तात्काळ विश्वास न ठेवता संबंधित यंत्रणेकडून माहितीची पडताळणी करावी, असे त्यांनी सांगितले. सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती, कागदपत्रे व फोटो अनावश्यकपणे शेअर करू नयेत. ऑनलाइन खरेदी करताना विश्वासार्ह वेबसाइट किंवा ॲपचाच वापर करावा. संशयास्पद कॉल, मेसेज किंवा व्हॉटस अप संदेश प्राप्त झाल्यास त्याला प्रतिसाद देण्यापूर्वी सत्यता पडताळून पाहावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. सायबर फसवणूक झाल्यास नागरिकांनी घाबरून न जाता तात्काळ १९३० या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा आणि तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयाच्या वरिष्ठ लिपिक विशाखा शेंडगे, श्रीकांत देशमुख, मनोहर भारती, मानसी राऊत तसेच परमेश्वर मांडगे, किरण डहाळे आदी उपस्थित होते.

# संभाव्य दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत : राहुल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ सप्टेंबर -**
नांदेड जिल्ह्यात चालू पावसाळी हंगामात अपेक्षित सरासरीच्या तुलनेत पर्जन्यमानात घट झाली आहे. त्यामुळे आगामी काळात संभाव्य पाणीटंचाई व दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता उपलब्ध पावसाच्या पाण्याचे जास्तीत जास्त संवर्धन करून भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रभावी जलसंधारणाची कामे हाती घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सेवा संकल्प अभियानांतर्गत रोजगार हमी व विकसित भारत रोजगार व आजीविका हमी ग्रामीण योजनेच्या माध्यमातून जलतारा, सिमेंट नाला बांध, विहिरींचे पुनर्भरण तसेच बोअरवेल/बोअर पुनर्भरणाची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात येत आहेत.

ग्रामीण भागातील कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देतानाच टिकाऊ व उत्पादक मालमत्ता निर्माण करणे, हा रोजगार हमी योजनेचा प्रमुख उद्देश आहे. जमीन, पाणी व वृक्षांच्या विकासातून शेती व शेतीशी संबंधित उत्पादक मालमत्ता निर्माण करण्यावर या योजनेत विशेष भर देण्यात आला आहे. या माध्यमातून गावातील नागरिकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होण्यासोबतच पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते अडवून जमिनीत मुरविण्यास मदत होणार आहे.

**शेतकरी, ग्रामस्थांनी कामांची मागणी ग्राम पंचायतीकडे नोंदवावी**

शेतकरी, ग्रामस्थ व नागरिकांनी आपल्या गावातील तसेच शेतजमिनीवरील आवश्यक जलसंधारणाच्या कामांचे प्रस्ताव संबंधित ग्रामपंचायतीकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. यामध्ये जलतारा, सिमेंट नाला बांध, विहीर पुनर्भरण आणि बोअरवेल/बोअर पुनर्भरण या कामांना प्राधान्य देता येणार आहे.

ज्या शेतकरी व नागरिकांना त्यांच्या शेतजमिनीवर किंवा परिसरात ही कामे घ्यावयाची आहेत, त्यांनी संबंधित ग्राम पंचायत कार्यालय, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक किंवा पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधून कामाची मागणी नोंदवावी. प्राप्त मागणी व प्रस्तावांची प्रचलित नियमांनुसार तपासणी करून पात्र व अनुज्ञेय कामांचे नियोजन करण्यात येणार आहे.

ग्रामपंचायतींनीदेखील आपल्या कार्यक्षेत्रातील जलस्रोत, नाले, पाणलोट क्षेत्र, विहिरी व बोअरची सद्यस्थिती लक्षात घेऊन आवश्यक कामांचे प्राधान्यक्रम निश्चित करावेत. तसेच ग्रामसभेत या कामांचा एकत्रित आराखडा तयार करून मान्यतेनंतर पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**एका जलताऱ्यातून सुमारे ३.६० लाख लिटर पाणी जमिनीत मुरविण्याची क्षमता**

शेतातील पाणी एकवटणाऱ्या उताराच्या ठिकाणी अथवा जमीन चिभडणाऱ्या ठिकाणी साधारण ५ फूट रुंद, ५ फूट लांब व ६ फूट खोल खड्डा तयार करून त्यामध्ये मोठे व मध्यम आकाराचे दगड भरून जलतारा तयार केला जातो. एका जलताऱ्यातून सुमारे ३.६० लाख लिटर पाणी जमिनीत मुरविण्याची क्षमता असल्याने विहीर व बोअरवेलमधील पाणीसाठा वाढण्यास मदत होते.

जलताऱ्यांसह विहीर व बोअर पुनर्भरणाच्या कामांमुळे पावसाचे पाणी स्थानिक पातळीवर अडवून जमिनीत मुरविणे, भूजल पातळी वाढविणे आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता टिकविणे शक्य होणार आहे. रोजगार हमीच्या माध्यमातून ही कामे केल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक पातळीवर रोजगारही उपलब्ध होणार आहे.

**नांदेड जिल्ह्यात १ लाख जलतारा करण्याचा संकल्प**

नांदेड जिल्ह्यात १ लाख जलतारा करण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाने केला आहे. त्यादृष्टीने कामाला गती देण्यात आली असून आतापर्यंत जिल्ह्यात ३५ हजार ७७५ जलतारांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३१ हजार ३६० कामांना तांत्रिक मान्यता, तर २८ हजार ४०१ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यापैकी २ हजार १ जलताऱ्यांची कामे प्रत्यक्ष सुरू झाली आहेत.

जलसंधारणाच्या या कामांमुळे संभाव्य पाणीटंचाई व दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढाकार घेऊन आपल्या गावातील व शेतजमिनीवरील आवश्यक जलतारा, सिमेंट नाला बांध, विहीर पुनर्भरण, बोअरवेल/बोअर पुनर्भरण तसेच इतर जलसंधारणाच्या कामांचे प्रस्ताव तातडीने संबंधित ग्रामपंचायतीकडे सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

पाणी अडवा-पाणी जिरवा, भूजल वाढवा-पाणीटंचाई टाळा या उद्देशाने ग्रामस्थ, शेतकरी व ग्रामपंचायतींनी जलसंधारणाच्या कामांमध्ये व्यापक सहभाग नोंदवावा, असेही जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

## भाजपा अल्पसंख्याक मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी ॲड. माज बडगुजर

**किनवट** -भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्याक मोर्चाच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी ॲड. माज बडगुजर यांची नियुक्ती करण्यात आली. भाजपा नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्या हस्ते माहूर येथे ॲड. बडगुजर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासोबतच भाजपची विचारधारा आणि वरिष्ठ नेत्यांचे कार्य तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी ॲड. माज बडगुजर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडून संघटना अधिक बळकट करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याचे ॲड. बडगुजर यांनी यावेळी सांगितले. यावेळी भाजपा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुनीलजी राणे, भाजपा सहसंपर्कप्रमुख (मराठवाडा) नितीन काळे, आमदार भीमराव केराम, प्रदेश उपाध्यक्ष चैतन्य बापू देशमुख, भाजपा नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र प्रदेशचे प्रदेश संयोजक सुधाकर भोयर, भाजपा मंडळ अध्यक्ष उमाकांत कराळे, स्वागत आयनेनीवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, ॲड. नैतिक नाईक, संध्या राठोड, नगरसेवक गोपमहामने, संतोष मरसकोल्हे आणि नीलकंठ मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. नियुक्तीनंतर ॲड. माज बडगुजर यांनी आमदार भीमराव केराम, भाजपा नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख तसेच उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले. अल्पसंख्याक समाजासह सर्व घटकांना पक्षाच्या संघटनेशी जोडण्यासाठी तसेच पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## श्री शिव गणेश मित्र मंडळाकडून आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर

**नांदेड** -गणेशोत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देत श्री शिव गणेश मित्र मंडळ, इस्लापूर यांच्या वतीने गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी भव्य आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भक्ती, उत्साह आणि सामाजिक जबाबदारीचा संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमातून नागरिकांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या शिबिरात बालरोग, स्त्रीरोग, कान-नाक-घसा, नेत्ररोग, अस्थिरोग तसेच रक्त तपासणी अशा विविध आरोग्य तपासण्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना विविध आरोग्य तपासण्यांसाठी दूरवर जावे लागू नये आणि वेळेत आरोग्याची तपासणी करून घेता यावी, या उद्देशाने मंडळाने हा उपक्रम हाती घेतला आहे. रक्तदानातून जपूया माणुसकीची नाळ!

आरोग्य तपासणीसोबतच रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून, गरजू रुग्णांसाठी रक्ताची उपलब्धता निर्माण करण्याच्या सामाजिक उद्देशाने नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः युवकांनी मोठ्या संख्येने पुढाकार घेऊन रक्तदान करावे, अशी अपेक्षा मंडळाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

**गणरायाच्या उत्सवाला समाजसेवेची जोड**

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता त्यातून समाजहिताचे कार्य घडावे, या भावनेतून श्री शिव गणेश मित्र मंडळाने आरोग्यसेवेचा हा उपक्रम आयोजित केला आहे. आरोग्य तपासणी, रक्त तपासणी आणि रक्तदान अशा विविध उपक्रमांमुळे इस्लापूर व परिसरातील नागरिकांना एकाच ठिकाणी आरोग्यविषयक सुविधा मिळणार आहेत. इस्लापूर व परिसरातील नागरिकांनी गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित या आरोग्य व रक्तदान शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, तसेच पात्र रक्तदात्यांनी रक्तदानासाठी पुढे यावे, असे आवाहन श्री शिव गणेश मित्र मंडळ, इस्लापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मोहम्मद हकीम यांची शिवसेना भोकर विधानसभा उपप्रमुखपदी नियुक्ती

**मुदखेड**-शिवसेना अल्पसंख्याक विभागाच्या संघटनात्मक विस्ताराला गती देण्यासाठी मोहम्मद हकीम मोहम्मद गौस यांची शिवसेना भोकर विधानसभा उपप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. शिवसेनेचे उपनेते, मंत्री दर्जा, माजी खासदार तथा विधान परिषदेचे गटनेते आमदार हेमंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.



शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार सईद भैया खान यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली. शिवसेना भोकर विधानसभा नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक इंजि. विश्वंभर पवार, पत्रकार अयुब पठाण यांच्या उपस्थितीत तसेच शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे नांदेड जिल्हाप्रमुख अनवर अहेमद यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी अर्धापूर तालुका प्रमुखपदी शेख लायक मिया मौला साब, नांदेड जिल्हा उपप्रमुखपदी चाऊस जुबेर बिन बदर याफई, जिल्हा संघटकपदी लतीफ खान पिर खान पठाण आणि जिल्हा सहसचिवपदी शेख कलीम शेख गफुर यांचीही नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमास शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा सचिव शेख फरीद भाई, शहरप्रमुख शेख फारुख भाई, युवा शहरप्रमुख साजिद खान, भोकर विधानसभा प्रमुख मोहम्मद बुरहान, शेख बाबा भाई, जावेद कुरेशी यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी मोहम्मद हकीम मोहम्मद गौस यांचे अभिनंदन करून नव्या जबाबदारीस शुभेच्छा दिल्या.

# मूखेड तालूक्यात कोरडा दूष्काळ जाहिर करण्याची समनक जनता पार्टिची मागणी

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २२ सप्टेंबर -**
मूखेड तालुक्यात मागील दिड महिन्यांपासून पावसाने मोठी उघडीप दिल्यामुळे खरीप हंगामातील पिके हि पाण्याअभावी वाळून गेली असून शासनाने त्वरीत कोरडा दूष्काळ जाहिर करुन शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रु मदत करण्याची मागणी मूख्यमंत्र्या कडे तहसीलदारा मार्फत ऐका निवेदनाद्वारे स. ज. पा. चे जिल्हा अध्यक्ष प्रा. निळू पवार यांनी केली आहे.

मूखेड तालुका हा डोंगराळ असून पावसाच्या पाण्यावरच सोयाबीन, कापूस, मूग, उडीद, ज्वारी आदी पिके घेतली जातात पण यंदा तब्बल दिड महिन्या पासून पाऊस नसल्याने खरीप पिकावर मोठा परिणाम झाला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके वाळू गेलीआहेत.

शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने खरीप हंगामाची पिके घेतली होती. मात्र पावसाअभावी पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. वाढता उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि हातातून जाणारे पीक उत्पादन यामुळे शेतकऱ्यांसमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

दुष्काळी परिस्थितीची तातडीने पाहणी करावी, पीक नुकसानीचे पंचनामे करावेत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रु .तातडीने आर्थिक मदत व आवश्यक सवलती द्याव्यात, अशी मागणी केली.

यंदाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून उर्वरित खरीप पिकांनाही पावसाअभावी मोठा फटका बसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने विलंब न करता प्रत्यक्ष शेतपातळीवर परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी एका निवेदनाद्वारे तहसिलदार यांच्या मार्फेत मुख्यमंत्री यांच्या कडे करण्यात आली. यावेळी स.ज .पा.चे जिलाध्यक्ष प्रा निळू पवार यांच्या सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# सचखंड पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिकेचा मनमानी कारभार; विना परवाना गणवेश बदलून गरीब पालकांची आर्थिक लूट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ सप्टेंबर -**
गुरुद्वारा सचखंड बोर्ड द्वारा संचलित असलेल्या प्रतिष्ठित सचखंड पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिकेने यांनी शासनाची व प्रशासकाची कोणतीही परवानगी न घेता शाळेचा गणवेश बदलून पालकांची आर्थिक पिळवणूक सुरू केल्याचा गंभीर आरोप पालकांनी केला आहे. याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

**काय आहे प्रकरण?**

तक्रारदार पालक स. जगदीप सिंघ नंबरदार व इतर पालकांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मुख्याध्यापिकेने कोणताही कार्यालयीन आदेश नसताना जुन्या गणवेशात बदल करून नवीन ड्रेसच्या नावाखाली २ते ३ प्रकारचे वेगवेगळे ड्रेस घेण्याची सक्ती केली आहे. विशेष म्हणजे हे सर्व ड्रेस त्यांच्या जवळच्या परिचयाच्या एकाच दुकानातून खरेदी करण्याची जबरदस्ती पालकांवर केली जात आहे.

**गरीब पालकांवर आर्थिक बोजा**

ही शाळा मुळात गोरगरीब, रोजंदारी मिस्त्री, ऑटो चालक, फळे व भाजी विक्रेत्यांच्या मुलांना कमी फीमध्ये उइडए पॅटर्नचे शिक्षण मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आली होती. मात्र, अचानक गणवेश बदलामुळे गरीब पालकांना हजारो रुपयांचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत असून त्यांचा शाळेवरील विश्वासच उडाला आहे.

नियमानुसार शिक्षणाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय गणवेशात बदल करता येत नाही. तरीही नियम धाब्यावर बसवून हा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकरणी दि. ०६/०८/२०२६ रोजी माहिती अधिकारात माहिती मागितली असता, माहिती न देता आवाज दाबण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचाही आरोप आहे. यापूर्वीही अनेक समाजसेवकांनी तक्रार केली होती परंतु गुरुद्वारा प्रशासन या मुख्याध्यापिकेवर कसलीच कारवाई करत नाही याचे काय कारण आहे?

शाळेने गणवेश बदलाची अधिकृत परवानगी घेतली आहे का? याची चौकशी करावी, विना परवाना बदल झाला असेल तर मुख्याध्यापिकेवर दंडात्मक कारवाई करून, पालकांकडून उकळलेले अतिरिक्त शुल्क त्यांच्या पगारातून कपात करून परत द्यावे. अशी तक्रार मध्ये नमूद केले आहे. व या तक्रारीमध्ये जगदीपसिंघ नंबरदारसह, राजेंद्र सिंग पुजारी माजी मेंबर गुरुद्वारा सचखंड बोर्ड, मनबीर सिंघ ग्रंथी ,मनिंदर सिंघ राज रामगडया, बक्षी सिंघ पुजारी, गुरुबचन सिंघ कारागीर, प्रेमजीत सिंघ शिलेदार, विजेंदर सिंघ बिट्टू शर्मा, अवतार सिंघ, जितेंद्र सिंग ठाकूर, कमलजीत सिंघ रागी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत

या तक्रारीच्या प्रती जिल्हाधिकारी नांदेड, गुरुद्वारा बोर्ड प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ जी व शिक्षणाधिकारी माध्यमिक, गट शिक्षणाधिकारी यांनाही देण्यात आल्या आहेत. या प्रकरणी शिक्षण विभाग काय कारवाई करतो, याकडे सर्व पालकांचे लक्ष लागले आहे.

# आदमपूर येथील हुजूर पिंजारीचे गणेश उत्सवात अन्नदान

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २२ सप्टेंबर -**
बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील कोळनुरे- चिंतले- शिनगारे यांच्या गल्लीत विराजमान असलेल्या छावा गणेश मित्र मंडळ स्थळी सोमवार दि.२१ सप्टेंबर रोजी गावातील रहिवासी खासगी वीज कामगार हुजूर बाबूसाब पिंजारी यांच्या वतीने प्रसादरूपी खिचडीचे अन्नदान वाटप करण्यात आले.यावेळी परिसरातील भाविक भक्तांनी प्रसादाचा आस्वाद घेतला.

सर्वधर्मसमभावाची शिकवण मनात साठवून हे केलेले कार्य निश्चितच सकारात्मक असेच आहे. हिंदू-मुस्लिम धार्मिक एकात्मतेचे आदमपूर परिसरात वातावरण अधिकाधिक मजबूत असल्याचे हे जीवंत द्योतक आहे.यावेळी प्रतिष्ठित नागरिक दिपक कुलकर्णी, आगडम दास शिनगारे,माजी सरपंच प्रतिनिधी साईनाथ चिंतले,माजी उपसरपंच रामराव चिंतले,माजी सरपंच अंबादास शिनगारे,सुनील चिंतावार सावकार, यशवंत शिनगारे,शिवदास मुंगडे,केदार शिनगारे, दिनकर कोळनुरे,केशव कोळनुरे,रज्जाक पिंजारी, उस्मान पिंजारी,हुजूर पिंजारी,कृष्णा शिनगारे,लक्ष्मीकांत कोळनुरे,श्रीकांत कोळनुरे,समर्थ कोळनुरे,प्रथमेश चिगळे, वैभव भुरे,अच्युत भरगिरे,गंगाधर पांढरे,छावा गणेश मित्र मंडळ कार्यकर्ते स्वयंसेवक आदिंची विशेष उपस्थिती होती.

## मुरलीधर थोरात यांचे निधन



**नांदेड** -तथागतनगर येथील उपासक मुरलीधर उकंडजी थोरात (५९) यांचे काल दि.२१ सप्टेंबर रोजी हैदराबाद येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

त्यांच्यावर आज दि.२२ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता गोवर्धनघाट येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मुरलीधर उकंडजी थोरात हे महाराष्ट्र बँकेमध्ये कर्मचारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे.

# कंधार तालुक्यात सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करा; फुलवळ सर्कलमधील शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि. २२ सप्टेंबर -**
कंधार यावर्षी पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने कंधार तालुक्यातील शेती पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून, तालुक्यात सरसकट कोरडा दुष्काळ तातडीने जाहीर करावा, अशी मागणी फुलवळ सर्कलमधील शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

माजी सरपंच बालाजी भुजंगा देवकांबळे आणि ग्रा.पं. सदस्या अनिता देवकांबळे यांच्या नेतृत्वाखाली समस्त शेतकरी व शेतमजूर बांधवांच्या वतीने हे निवेदन देण्यात आले. निवेदनाची प्रत आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनाही देण्यात आली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून बहुतांश भागात पिके जळून खाक झाली आहेत. शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी, बियाणे, खते व किटकनाशकांवर मोठा खर्च केला होता, मात्र पावसाने दगा दिल्याने खर्चही निघणे अशक्य झाले आहे. त्यामुळे शेतकरी आणि शेतमजूर अडचणीत सापडले आहेत.या निवेदनाद्वारे

शेतकऱ्यांनी चार प्रमुख मागण्या केल्या आहेत कोणतीही आणेवारी किंवा निकष न लावता कंधार तालुक्यात तातडीने 'सरसकट कोरडा दुष्काळ' जाहीर करण्यात यावा.,

, पंचनाम्याच्या वेळकाढू प्रक्रियेत न पडता दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना थेट एकरी ५०,००० रुपयांची आर्थिक मदत द्यावी.,शेतीचे काम नसल्याने शेतमजुरांच्या हाताला काम उरले नाही, त्यामुळे तालुक्यातील प्रत्येक शेतमजूर कुटुंबाला तातडीने १०,००० रुपयांची मदत जाहीर करावी. शेतकऱ्यांना १० क्ष्ज्ञ पर्यंतच्या शेती पंपाचे वीज बिल पूर्णपणे माफ करावे व पुढे मोफत वीज द्यावी, तसेच घरगुती ग्राहकांना २०० युनिटपर्यंत मोफत वीज (आंध्र प्रदेश, तामिळनाडू, दिल्ली, पंजाबच्या धर्तीवर) तसेच शैक्षणिक शुल्क माफी, कर्ज वसुलीस स्थगिती या दुष्काळी सवलती तातडीने लागू कराव्यात. अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. यावेळी शिवदास भीमराव शिवदास सोमासे, मारुती जलवाड, लक्ष्मण जाधव, शंकर वाघमारे,मनमत आप्पा मंगनाळे, बालाजी थाटे, सुभाष फुलवले, संभा बसवंते, जयराम सोमासे केशव शिंदे लक्ष्मण मंगनाळे प्रभू मनोहर सोमासे खयुम शेख यासह महिला मंजूर मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पाळजच्या गणरायाच्या चरणी चिखलीकर कुटुंबीयांची प्रार्थना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ सप्टेंबर -**
गणेशोत्सवानिमित्त लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सहकुटुंब पाळज येथील गणपती बाप्पाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी विधिवत पूजा-अर्चा करून नांदेड जिल्ह्यासह परिसरातील नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

यंदा पावसात मोठा खंड पडल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. पिकांच्या वाढीवरही त्याचा परिणाम होत असल्याने बळीराजाची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार चिखलीकर यांनी गणरायाच्या चरणी विशेष प्रार्थना केली. नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडू दे, शेतकरी बळीराजा सुखी व समृद्ध होऊ दे, त्याच्या शेतात भरघोस पीक येऊ दे आणि प्रत्येक शेतकरी कुटुंबाच्या जीवनात आनंद नांदू दे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी माजी आमदार अविनाश घाटे, माजी आमदार सुभाषराव साबणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, अशोक पाटील मुगावकर, प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका प्रणिता ताई देवरे चिखलीकर,



प्रतिभा प्रतापराव पाटील चिखलीकर, डॉ. प्रमोद पाटील चिखलीकर यांच्यासह नागनाथ घिसेवाड, शिवाजी लगळूदकर, श्रीकांत किन्हाळकर, आनंदराव बोरगावकर, सुरेश बिल्लेवाड, गिरीश रावणगांवकर, नागोराव शेंडगे, आप्पाराव राठोड, चंद्रकलाबाई गायकवाड, पांडुरंग शिंदे, जावउद्दीन बर्बडेकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने यावेळी पाळज परिसर भक्तिमय झाला होता. गणेशोत्सवानिमित्त पाळज येथे भाविकांची मोठी गर्दी होत असून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दर्शनानंतर आमदार चिखलीकर यांनी उपस्थितांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. गणरायाच्या आशीर्वादाने नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंब सुखी-समृद्ध होवो आणि बळीराजाच्या जीवनात आनंदाचे दिवस येवोत, अशी सदिच्छाही त्यांनी व्यक्त केली.

# एका हाताने साकारली बाप्पाची मूर्ती; तनिष्काचा विशेष सन्मान

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २२ सप्टेंबर -**
गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शाडूमातीच्या गणेशमूर्ती तयार करण्याच्या कलेला प्रोत्साहन देणारा 'मूर्तीकलेचा कौतुक व सन्मान सोहळा-२०२६' उत्साहात पार पडला. देवदूत गणेश मंडळाच्या वतीने आयोजित या उपक्रमात ५० विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.



मूर्तिकार चरण खराडे व प्रशिक्षक बालाजी पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना शाडूमातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. पीओपीच्या मूर्तींऐवजी शाडूमातीच्या मूर्तींचा वापर करण्याबाबतही जनजागृती करण्यात आली.

दरम्यान, इयत्ता तिसरीतील कु. तनिष्का नंदकिशोर साळुंके हिची जिद्द विशेष कौतुकाचा विषय ठरली. एका हाताने अपंगत्व असतानाही तनिष्काने आत्मविश्वासाने गणपती बाप्पाची सुबक मूर्ती साकारली. तिच्या कलागुणांचे उपस्थितांनी कौतुक केले. तनिष्कासह तिच्या आई-वडिलांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास सिंक्रोमेक कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक तानाजी शेटे, संजय शहाणे, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर, शिवानंद थोरकर, रविंद पांचाळ, जालींदर सोनवणे, चरण खराडे, कल्याण पिनप्रितवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तानाजी शेटे यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मूर्तींचे कौतुक करून प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला पेन भेट दिले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देणारा आणि तनिष्काच्या जिद्दीची प्रेरणा देणारा हा उपक्रम ठरला.